26 APRIL TO 02 MAY 2021 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 24/04/2021 8:01 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : १८ सोमवार दि. २६ एप्रिल २०२१ ते रविवार दि. ०२ मे २०२१ पाने : ४ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## अग्निशमन दलाचा आंधळा कारभार

वसई विरार महानगर पालिकेची स्थापना झाल्यापासून म्हणजेच २००९ पासून अग्निशमन दल कार्यरत आहे. पण अजून त्याला मुख्य अग्निशमन अधिकारी नाही. मुंबई सांताक्रूझ येथील अग्निशमन कार्यालयाने २०१५ मध्येच वसई-विरारसाठी अग्निशमन अधिकारी नेमा अशा सूचना वसई विरार महापालिकेला केल्या होत्या. पण सत्ताधारी बाविआ आणि पालिका प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले. पण आश्चर्याची गोष्ट अशी की अग्निशमन दलाला मुख्य अधिकारी नसतानाही आतापर्यंत अग्निशमन दलासाठी ३५ ते ४० कोटींची अत्याधुनिक अग्निशमन सामुग्री खरेदी करण्यात आली, ज्यात ४५ मीटर उंचीच्या यांत्रिकशिडीसह इतर अनेक अत्याधुनिक साहित्याचा समावेश आहे. एवढं खर्च करूनही सामुग्री आणली पण ती चालवण्यासाठी प्रशिक्षित स्टाफच नसल्याने ती सामुग्री धूळ खात पडली आहे. अग्निशमन दलात केवळ ७ कायमस्वरूपी कर्मचारी आहेत, तर उर्वरित २१८ कर्मचारी हे स्वयंभू ट्रान्सपोर्ट पुणे या कंपनीकडून कंत्राटी पद्धतीने मागवले आहेत. सध्या ते अस्थायी कर्मचारी म्हणून काम करीत आहेत. दिलीप पालव हा सहाय्यक अग्निशमन अधिकारी आहे, पण सर्वत्र मुख्याधिकारी म्हणून सह्या करतो आणि पालिका डोळे मिटून हे सर्व पाहत आहे.

# वसई-विरारमध्ये महानगरपालिकेच्या अग्निशमनदलाचे झाले हसे अत्याधुनिक यंत्रसामुग्री असताना अग्निकांडात लोकं मरतात कसे

विरार/वरिष्ठ प्रतिनिधी

सध्या संपूर्ण महाराष्ट्र कोरोनाच्या विळख्यात सापडलेला आहे. राज्यातील सर्व हॉस्पिटल तसेच कोव्हिड सेंटर कोरोना रुग्णांनी खचाखच भरले आहेत. अशावेळी या रुग्णालयांच्या सुरक्षेबाबत सरकार आणि स्थानिक पालिका प्रशासन सतर्क असायला हवे. पण दुर्दैवाने तसे कुठेही दिसत नाही. त्यामुळे कोव्हिड रुग्णालयात कोण आत्महत्या करतोय, कोणावर चाकू हल्ला होतोय, कोणाचा विनयभंग होतोय, तर कुठे रेमडेसिवीर सारख्या औषधांची चोरी होतेय. या झाल्या किरकोळ घटना. पण बुलढाणा येथील रुग्णालयात सहा अर्भकांचा होरपळून मृत्यू झाल्यानंतर सरकारने सर्व रुग्णालयांचे फायर ऑडिट करण्याचे आदेश दिलेले असतानाही अनेक रुग्णालयांनी हे आदेश केराच्या टोपलीत टाकल्याने वायू गळती आणि आगीच्या घटना घडत आहेत. महाराष्ट्रात ४८ तासात वायू गळती आणि आगीच्या दोन घटना घडून त्यात ४३ कोरोना बाधितांचा मृत्यू झाला.



नाशिक मधील पालिका रुग्णालयात गॅस गळती होऊन एक तास ऑक्सिजन पुरवठा खंडित झाल्याने व्हेन्टीलेटरवर असलेल्या २९ रुग्णांचा तडफडून मृतू झाला आणि या भयंकर घटनेतून महाराष्ट्र सावरायच्या आतच विरारच्या विजय वल्लभ रुग्णालयात जे घडल त्याने सरकार आणि वसई-विरार महापालिका प्रशासनाच्या अब्रूचा कोळसा करून टाकलाय. पहाटेच्या सुमारास या रुग्णालयातील आयसीयु विभागाला एसीमध्ये झालेल्या शोर्टसर्किटमुळे आग लागली आणि या आगीत १४ कोरोना बाधितांचा होरपळून मृत्यू झाला. सगळ्यात शरमेची बाब म्हणजे या आगीच्या घटनेची माहिती अग्निशमन दलाच्या प्रमुखांना देण्याचा प्रयत्न सुरु असताना हा बेजवाबदार अधिकारी डाराडूर झोपलेला होता. शेवटी त्याच्या घरी जावून त्याला कुंभकर्णी झोपेतून उठवावे लागले. अग्नीशमनदल वेळेवर घटनास्थळी पोहचू शकले नाही, त्यामुळेच एवढे नुकसान आणि प्राणहानी झाली असा आरोप मृतांच्या नातेवाईकांनी केला असून या अग्निशामक दल प्रमुखावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्याला कायमचे तुरुंगात झोपायला पाठवा अशी संतप्त प्रतिक्रिया वसई विरार मधील जनतेने व्यक्त केली आहे. राहता राहिला प्रश्न इथल्या लोकप्रतिनिधींचा तर ते असून नसून सारखेच आहेत. त्यांना इथल्या लोकांची काहीच पडलेली नाही. त्यातच वसई विरार महापालिका बरखास्त झालेली आहे. त्यामुळे आम्ही काय करणार असे म्हणत इथल्या सत्ताधारी बविआच्या नगरसेवकांनी आपले हात झटकले. बरोबर आहे त्यांचे त्यांचा संबंध फक्त इथल्या ...पान २ वर

# लंपटगिरीचा शेवट भयंकर झाला परस्त्रीच्या मोहापायी जीवानिशी गेला

पनवेल/राजेंद्र वेदांते

देखणी बायको दुसऱ्याची असे प्रत्येकाला वाटत असते. त्यामुळे आपल्या घरात किती जरी सुंदर पत्नी असली तरी काही लोकं बाहेर जावून शेण खात असतात. कारण आपल्या बायको पेक्षा त्यांना दुसऱ्याची बायको अधिक सुंदर आहे असे वाटू लागते. त्यातूनच काही लोकं दुसऱ्याच्या बायकांच्या मागे लागतात. अशावेळी ज्या चालू असतात त्या पटतात आणि ज्या पतीशी एकनिष्ठ असतात त्या मात्र समोरच्याला अजिबात भाव देत नाहीत. पनवेल येथे अशाच एका घटनेत एका मजुराच्या सुंदर पत्नीच्या मागे दुसरा एक इसम लागला होता. पण ती त्याला भाव देत नव्हती. मात्र जेंव्हा हा प्रकार तिच्या पतीला समजला तेंव्हा त्याने मित्रांच्या मदतीने या लंपटाला दारू प्यायला नेवून त्याचा गेम केला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.

संशय हा रोग कोरोनापेक्षा ही भयानक आणि भयंकर रोग आहे. हा रोग ज्या व्यक्तीला डोक्यात शिरला की त्याच्या संसाराची वाट लागलीच म्हणून समजा. अशी अनेक उदाहरण आहेत. एकदा का संशयाचं भूत अंगावर बसलं की, तो पती सैतान होतो. आपल्या पत्नीचे एका तरूणांबरोबर अनैतिक संबंध असल्याचा संशय त्या व्यक्तीला गप्प बसून देत नाही. त्याच्या मनात लगेच कालवाकालव सुरू होते. तो त्या विचाराने डिप्रेशन (तणावात) जातो. मग पत्नीला कायमची अद्दल घडवण्याचा विचार करू लागतो.यात तो पत्नीचा कायमचा काटा काढण्यास मागेपुढे बघत नाही. आपल्या पत्नीचे कुणाबरोबर अनैतिक संबंध आहेत हा संशय पुरूषाला स्वस्थ बसू देत नाही. ...पान २ वर

# दारूच्या नशेत त्यांच्याकडून भलतेच घडून गेले शुल्लक कारणावरून बिचाऱ्या वाटसरूला ठार केले

भुसावळ/क्राईम रिपोर्टर



मयत संदीप

दारूच्या नशेत माणसाच्या हातून काय घडेल याचा नेम नाही. कारण दारू डोक्यात गेल्यावर त्या माणसाचा स्वतःवर कंट्रोल राहत नाही. एखादे शुल्लक कारणही त्याला हैवान बनवू शकते. भुसावळमध्ये तीन मित्र रस्त्याच्या कडेला दारू पीत बसले होते. इतक्यात तेथून एक इसम जात होता. त्याने फक्त या तिघांकडे पाहिले बस एवढ्या शुल्लक कारणावरून त्या तीन दारुड्यांनी त्याची दगडाने ठेचून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी त्या तिन्ही आरोपींना अटक केली आहे.





आरोपी अजय आरोपी आशिष आरोपी पंकज



भुसावळ शहरातील समता नगर ध्यान केंद्राजवळ संदीप गायकवाड हा तरुण आपल्या परिवारासह रहात होता. पत्नी व दोन्ही मुले नातेवाईकांकडे मुक्कामी गेल्यामुळे संदीप गायकवाड घरी एकटाच होता. काही दिवसात लॉकडाऊन लागण्याची शक्यता गृहीत धरुन बाहेर पडण्यावर मर्यादा येणार असा विचार करत थोडे फिरुन येण्यासाठी संदीप एकटाच घराबाहेर पडला. १२ एप्रिलची ती रात्र होती. त्या रात्री साधारण ...पान २ वर

# अनैतिक संबंधात यशोदाचा तोल गेला दिराच्या मदतीने पतीचाच खून केला

पैठण/क्राईम रिपोर्टर

नात्यातले अनैतिक संबंध सहसा लपून राहत नाहीत आणि एकदा का ते उघडकीस आले कि मग समाजात तोंड लपवायला जागा राहत नाही. त्यामुळे एकतर असे संबंध संपवायचे तरी असतात अन्यथा अशा संबंधात अडथला ठरणाऱ्याला तरी संपवायचे असते. पैठणमध्ये दीर भावजय मधील अनैतिक संबंधाचा असाच भयंकर शेवट झाला आणि एका पत्नीने आपल्या अनैतिक संबंधात अडथला ठरणाऱ्या पतीचा दिराच्या मदतीने खून केला. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.





यशोदा आणि शिवाजी हे नात्याने दिर भावजय होते. दोघांचे नाते दिर-भावजयीचे असले तरी संबंध मात्र प्रेमाचे झाले होते. दोघांचे प्रेमाचे संबंध अनैतीक संबंधात रुपांतरीत होण्यास वेळ लागला नाही. वास्तविक यशोदा ही विवाहीता होती. शिवाजी हा तिचा चुलत का असेना नात्याने दिर होता. त्यामुळे त्यांनी आपल्या नात्यानुसार एकमेकांसोबत वागायला हवे होते. मात्र दोघांनी आपले नाते विसरुन एकमेकांसोबत प्रेमाचे व अनैतिक संबंधाला हवा दिली होती. दोघांच्या नात्याला अनैतीकतेची हवा लागल्याने वासनेची आग पेटण्यास वेळ लागला नाही. या आगीतून निघणारा धुर यशोदाच्या पतीपर्यंत अर्थात रघुनाथपर्यंत पोहोचण्यास वेळ लागला नाही.... पान २ वर

# रेखाच्या व्याभिचाराला सासरीही फुटल्या अनेक वाटा जावयाच्या मदतीने बापानेच काढला लेकीचा काटा

यवतमाळ/क्राईम रिपोर्टर

पुरुषाच्या सहवासाला चटावलेली बाई तिच्या कुटुंबियांसाठी बदनामीचे कारण ठरलेली असते. त्यामुळे अशा चालू बाईला अगोदर सासरची आणि माहेरची मंडळी प्रेमाने समजावण्याचा प्रयत्न करतात. पण त्यानंतरही तिच्या वागण्यात जेंव्हा बदल होत नाही तेंव्हा मग कुटुंबियांना आपली अब्रू वाचवण्यासाठी तिच्याबाबत कठोर निर्णय घ्यावाच लागतो. पेढरी गावची रेखा अशीच चालू होती. माहेरी तिचे अनेक तरुणांशी अनैतिक संबंध होते. म्हणून बापाने लग्न लावून दिले. पण सासरी सुद्धा ती पतीच्या मित्रांना जवळ घेऊ लागली. त्यामुळे पती चिडला व त्याने रेखाला सोडण्याचा निर्णय घेतला. तिच्या बापाला तसे कळवले. पण आपली चालू मुलगी माहेरी आली तर पुन्हा आपली बदनामी होईल असे बापाला वाटू लागले व बापानेच जावयाच्या व मुलाच्या मदतीने मुलीला ठार मारले व तिने आत्महत्या असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी त्यांचा हा डाव उधळून त्यांच्या मुसक्या आवळल्या.




पेढरी येथील विलास मरापे यांची मुलगी रेखा हिचा विवाह गेल्या काही वर्षापूर्वी पांढरकेवडा तालुक्यातीलच रामु शेडमाके याच्याशी समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे झाला होता. रेखा ही मुळातच चंचल आणि दिलफेक स्वभावाची होती. लग्नाअगोदरच तिचे गावातील काही तरूणांच्याबरोबर प्रेमसंबंध होते. तिच्या त्या प्रेमसंबंधातील भानगडीने तिचे घरचे लोक वैतागलेले होते. ती चांगल्या वळणाची मुलगी नाही तिचा स्वभाव हा चंचल आणि चालू असल्याने गावात ...पान २ वर

# प्रियकरासाठी तिने सुखी संसाराचा बळी दिला पतीचा खून करून आत्महत्येचा बनाव केला

सोलापूर/क्राईम रिपोर्टर



मयत भिमा ढाणे

एखाद्या बाईला जर पतीकडून मनासारखे शरीरसुख मिळाले नाही, तर मग ती दुसऱ्याला जवळ करते. अशावेळी समाज काय म्हणेल याची तिला परवा नसते. त्यातच जर पती अशा अनैतिक संबंधांमध्ये अडथला ठरू लागला तर मग त्याचाही काटा काढायला ती मागे पुढे पाहत नाही. मंगळवेढा येथे राहणारा पन्नाशीतला भीमा ढाणे आता थकला होता. तो पत्नीला मनासारखं सुख देत नव्हता म्हणून तिने दुसऱ्याला जवळ केले. पण याची कूणकूण पतीला लागताच घरात भांडणे होऊ लागली. पती दारू पिऊ लागला आणि एकेदिवशी त्याने दोघांना रंगेहात पकडले. त्यानंतर तर ती दोघं भयंकर चिडली होती आणि याच वादातून तिने पतीचा काटा काढण्याचा निर्णय घेतला आणि एके रात्री पतीला ठार मारून आत्महत्या केली असे भासवण्यासाठी दुसऱ्याच्या शेतातील झाडाला फासावर लटकवले. मात्र पोलिसांनी शेजारी पाजारी आणि नातेवाईकांच्या जबानीवरून तिला तिच्या प्रियकरासह अटक केली.

मंगळवेढा येथे भीमा सदा ढाणे हे आपल्या पत्नी मुलासह राहयला आहेत. त्याच्या लग्नाला कमीत कमी २५ वर्ष झाली होती. त्यांची पत्नी मनिषा ही तशी देखणी आणि सुंदर होती. भीमा ढाणे हे आपल्या कुंटूंबासाठी मिळेल तेथे काम करून आपल्या कुटूंबाचा चरिथार्थ चालवित होते. तसे त्याचे सुखी कुंटूंब होते. अशातच मनीषाच्या वागण्यात आणि बोलण्यात त्यांना फरक जाणवत होता. सुरूवातीला त्यांनी तिच्याकडे दुर्लक्ष केले होते. परंतू अलिकडे ती आपल्या मोबाईलवरून तास न तास कुणाशी तरी गप्पा मारत बोलत होती. याचा संशय भीमा याला येत होता. त्यातच भीमाला बाहेरून त्याच्या पत्नीच्या बाहेरख्याली संबंधाविषयी समजले होते. ती शांती नगर मंगळवेढा येथील आनंदा व्हनमुखे याला चिकटेलेली होती. त्या दोघांचे ते संबंध वाढीस लागलले होते. मनीषा ही त्याच्याशी फोनवरून तास न तास बोलत होती. आंनदा हा तरूण होता. तिची आणि त्याची ओळख ही एका कामाच्या ठिकाणी झालेली होती.

इकडे भीमाने वयाची ५०शी ओलांडली असल्याने त्या संबंधात तो रात्रीच्या खेळात जरा कमी पडत होता. नेमका याच संधीचा फायदा घेत मनीषा हिने आंनदा याला आपल्या अंगावर घेतले होते. त्या दोघांचा इष्काचा खेळ रंगात येत होता. भीमा घरात नसताना आनंदा हा दररोज दुपारी मनीषा ...पान २ वर

# फेसबूकचा प्रियकर भामटा निघाला पैसे आणि दागिने घेवून पळून गेला

मुंबई/क्राईम रिपोर्टर

सोशल मिडिया वरील फेसबुक किंवा व्हॉट्सअॅप हे आता केवळ मैत्रीचे साधन राहिलेले नसून काही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांसाठी तो एक धंदा बनलाय. फेसबुकवर चांगली प्रोफाईल बनवून टाकायची आणि तरुण मुलीना जाळ्यात ओढून त्यांना लग्नाचे आमिष दाखवून त्यांचे आर्थिक व लैंगिक शोषण करायचे असे प्रकार सुरु झालेत. त्यामुळे फेसबुकवरच्या मित्रांपासून प्रत्येक मुलीने सावध राहण्याची आवश्यकता आहे. मात्र हीच सावधगिरी झारखंड मधील एका मुलीला जमली नाही म्हणून ती एका भामट्याच्या जाळ्यात अडकली. फेसबुकच्या मैत्रीचे प्रेमात रूपांतर झाले आणि दोघांनी लग्न करायचे ठरवले. पण त्याच्या मनात नेमके काय होते याचा तिला अंदाज आला नाही. आपल्या आई वडिलांना भेटायला नेण्याच्या निमित्ताने त्याने तिला गोड्डा येथे आणले आणि तिचे दागिने व दीड लाख रुपये घेवून पळून गेला. मात्र तिने तत्काळ पोलीस ठाणे गाठून फिर्याद नोंदवल्याने पोलिसांनी काही तासातच या भामट्याला अटक केली.

फेसबुकवर अनेक अनेकांची फसवणूक झाल्याच्या असंख्य घटना आहेत. कुणाची आर्थिक फसवून होते तर कुणी याच ओळखीतून तरूणीवर लैंगिक अत्याचार करून मोकळा होतो. मुंबई पोलीसांच्या सायबर क्राईम युनिट मध्ये रोज साधारण ३ ते ५ तक्रारी दाखल होतात. प्रसार माध्यमाचा वापर करून हे भामटे रोजच लुटमारी करीत आहेत. फेसबुकच्या माध्यमातून फसवणूकीचा फंडा अवगत करून तरूणींना भुरळ घातली जाते. आता तर या ...पान २ वर

## पान १ वरून....

### वसई-विरारमध्ये महानगरपालिकेच्या ...

बांधकामांशी आहे. लोकांशी त्यांना काय घेणे-देणे. वसई विरारमध्ये अनेक खाजगी रुग्णालये आहेत. त्यांची कोरोनाच्या काळात काय स्थिती आहे, तिथे रुग्णांवर उपचार होतात कि नाही, या रुग्णालयांचे फायर ऑडिट झालेले आहे कि नाही हे जाणून घेण्याची जबादारी इथल्या लोकप्रतिनिधींची नव्हती का? असा सवाल वसई विरारकर विचारात आहेत. या उलट अर्नाळा पोलिसांनी खूप चांगली कामगिरी केली. त्यांच्या धावपळीमुळेच अग्निशमन दलाला जाग आली.

विरार पश्चिम येथील तिरुपती नगरातील रॉयल अॅकेडमी शाळेच्या शेजारी चार मजल्याचे विजय वल्लभ हॉस्पिटल आहे. सध्या ते कोविंड रुग्णांसाठी राखीव आहे. शुक्रवारी पहाटे २.४० ते २.५० च्या दरम्यान रुग्णालयातील दुसऱ्या मजल्यावर असलेल्या अतिदक्षता विभागाला आग लागली. त्यामुळे तेथे एकाच खळबळ माजली. यावेळी अतिदक्षता विभागात १७ कोव्हीड पेशंट होते. त्यातील चौघांनी वार्डच्या बाहेर पळ काढून कसातरी आपला जीव वाचवला. पण तेरा जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर ९० टक्के होरपळलेल्या रुग्णाचा नंतर मृत्यू झाला. मात्र आग लागताच हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनी मुख्य अग्निशमन अधिकारी दिलीप पालव यांना फोन केला. पण त्यांनी फोन उचलला नाही. दरम्यान या घटनेची माहिती अर्नाळा पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक महेश शेट्चे त्यांचे सहकारी पीएसआय सलगर हे रात्रपाळीच्या गस्तीवर असताना त्यांना माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि प्रथम ३.०७ वाजता या आगीची माहिती पोलीस नियंत्रण कक्षाला कळवली. त्यानंतर सूत्रे हलली आणि अग्नीशमन दलाच्या १० गाड्या घटनास्थळी पोहचल्या. ततूर्वी शेट्टी आणि सलगर या दोन पोलीस अधिकाऱ्यांनी अर्नाळा पोलीस ठाण्यातून आपला स्टाफ मागवून घेतला आणि रुग्णवाहिका मागवून इतर रुग्णांना दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये हलवले. पोलिसांच्या या कामगिरी आगीच्या घटनेने हादरलेल्या रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना दिलासा मिळाला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे एवढी गंभीर घटना घडूनही मुख्य अग्निशमन अधिकारी पालव घटनास्थळी पोहचले नव्हते. पोलिसांचे सुद्धा ते कॉल घेत नव्हते. येवढं बेजबाबदार माणूस आम्ही कधीच पाहिला नव्हता आणि याच माणसामुळे अग्निशमन दल वेळेवर घटनास्थळी पोहचले नाही आणि १४ लोकांना प्राण गमवावा लागला. त्यामुळे या माणसावर गुन्हा दाखल करून त्याला तात्काळ अटक करून त्याची चौकशी करा अशी मागणी वसई विरार मधील जनता करीत आहे. कोणत्याही शहरातील जनतेचे आगी पासून किंवा अन्य नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करण्याची जबाबदारी अग्निशमन दलावर असते. पण हॉस्पिटलच्या स्टाफचे पोलिसांचे फोन जावून जो माणूस बेफिकीर होऊन झोपलेला असतो अशा माणसाच्या भरवश्यावर वसई विरारच्या जनतेची सुरक्षा ठेवणार आहात का? वसई विरारमध्ये अनेक अधिकृत अनधिकृत हॉस्पिटल मॉल, शॉपिंग सेंटर, हॉटेल्स बार आहेत. त्यांचे सेफ्टी ऑडिट झाले की नाही हे कधी अग्निशमन दलाने पाहिले आहे का? ज्या विजय वल्लभ हॉस्पिटलमध्ये अग्निकांड झाले त्याच्या फायर ऑडिटची मुदत १४ मार्च रोजी संपली होती. ही बाब दिलीप पालवच्या लक्षात नव्हती का? की पैसे खाऊन त्याने याकडे काना डोळा केला. या अग्नीकांडाचा तपास गुन्हा अन्वेषण विभागाकडे आहे आणि त्यांनी आतापर्यंत केवळ हॉस्पिटल मधील व्यवस्थापक, डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल केलाय. मग अग्निशमन अधिकाऱ्यावर कधी गुन्हा दाखल करणार? दिलीप पालव हा सद्धा या घटनेला तितकाच जबाबदार आहे. त्यामुळे त्याच्यावरही गुन्हा दाखल करावा अशी मागणी जनता करीत आहे.

### लंपटगिरीचा शेवट भयंकर झाला...

हि वस्तुस्थिती खरी असो वा खोटी असो तो मागचा पुढचा विचार न करता संतापाच्या भरात आपल्या पत्नीचा जीव घेतो. खरी अशा घटना फारच दुर्दवी आणि समाजमनावर आघात करणाऱ्या असतात, पती-पत्नीच्या कलंकित करणाऱ्या असतात. परूंतू अशा घटनांना आपण आळा बसवू शकत नाही. हेच पूर्ण सत्य आहे. अनेक राज्यातून मजदूर पनवेलमधील बांधकाम व्यावसायिकांकडे येऊन आपला उदरनिर्वाह भागवू लागले. यात राहूल दान विलोग (वय २०) हा तरूण आपल्या पत्नीला घेऊन पनवेल तालुक्यातील घोट गावात राहयला आला होता. आला. पती-पत्नी दोघेच असल्यामुळे यांचा संसार सुखात चालला होता. राहूलची पत्नी देखणी होती. गरीब असली तरी निसर्गाने तिला सौंदर्य बहाल करण्यात कुठलीही कसर सोडली नव्हती. त्यामुळे तिच्यावर ज्याची नजर पडत होती तो व्यक्ती तिचा दिवाना होत होता. हे राहूलच्या पत्नीला ही माहित होते. म्हणून ती कुठल्याच पर पुरषाशी बोलताना त्याच्या नजरेला नजर देत नव्हती. तिचा कमनीय बांधा, शरीरावरील उतारचढाव तिच्या सौंदर्यात भर पाडत होते. राहून दिवसभर मजदूरीच्या कामात व्यस्त राहत होता. परूंतू त्याची पत्नी त्याच्या माघारी कोणाबरोबर ही संबंध ठेवत नव्हती. आपला पती संशयी वृत्तीचा आहे हे तिला माहीत असते. म्हणून ती जरा सावधच राहत होती. ती पती राहूल बरोबर प्रामाणिक होती. आपलं घर आणि आपण ऐवढेच तिचे जग होते. पतीच आपला परमेश्वर हे तिचे गणित होते. तरीही राहून तिच्यावर संशय घेत होता. तिच्यावर नजर ठेवत होता. याच दरम्यान एक तरूण दिनेश यादव (वय ३५) याची आणि राहूलच्या पत्नीची ओळख झाली. हि तातपुरती ओळख होती. परंतू दिनेश हा राहूलच्या संपर्कात येण्याचा सतत प्रयत्न करीत होता. पण राहूलची पत्नी दिनेशला वेळोवळी टाळण्याचा प्रयत्न करीत होती. तरीही दिनेश यादव एक एक पाऊल पुढे टाकण्याचा प्रयत्न करीत होता. तरीही दिनेश ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता. याची कुणकुण राहूला लागली होती. त्यामुळे राहूलचा पत्नीवरचा संशय अधिकच बळावला होता.आता त्याचे लक्ष कामावर ही लागत नव्हते. त्याचे मन चलबिचल झाले होते. तो अस्वस्थ होता, त्याची घुसमट होत होती.आपल्या माघारी आपल्या पत्नीचे दिनेश यादव याच्या बरोबर अनैतिक संबंध असल्याची खात्री पटवून न घेताच तो तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. मी फक्त दिनेश यादवला ओळखते. यापलीकडे त्याचे आणि माझे काहीही संबध नाही असे ती राहूलला अनेकदा पटवून सांगत होती. परंतू तो तिच काही एक ऐकण्याच्या म:नस्थितीत नव्हता. यामुळे त्यांच्यात कलह होत होता. अनेकदा यांच्यातला वाद विकोपाला जात होता. यामुळे या दोघांमधील नात अधिकच दुषीत झालं होते. घरात सतत धुसपुस सुरू होती. हिच धूसपुस त्याला शांत करायची होती. हा दिनेश यादव हाच आपल्या पत्नीच्या मागे लागला आहे. हाच काटा आपण कायमचाच काढला तर आपला संसार सुखी होईल. म्हणून राहूलने दिनेश यादव याचा मूडदा पाडण्याचा कट रचला. यासाठी त्याने आपल्या रतिश बराईक आणि राजू लोहरा या आपल्या दोन मित्रांना या कटात सामावून घेतले. राहूल, रतिश आणि राजू यांनी एक मिटींग घेऊन दिनेश यादवचा कसा काटा काढायचा हे ठरवले. आता यांचा बेत नक्की झाला होता. घटनेच्या दिवशी त्यांनी दिनेश यादव याला आपल्या सोबत घेऊन दारुच्या पार्टीचे आमंत्रण दिले. एका अज्ञातस्थळी त्यांची हि दारूपार्टी सुरू झाली होती. यावेळी त्यांनी दिनेश यादवला जास्त दारू पाजली होती. त्यामुळे दिनेश यादवचे संतुलन बिघडले होते. काय चाललय हे त्याला कळत नव्हते. त्याची पूर्णपणे शुद्धी हरपली होती. याचाच फायदा घेत व आपल्या ठरलेल्या कटाप्रमाणे त्यांनी दिनेशचा गळा दाबून त्याच्या गुप्तांगावर जबर मारहाण केली. आणि नंतर व्हीव्हीएफ कंपनीच्या पाठीमागील तलावाच्या ठिकाणी त्याला ऐका तलावातील पाण्यात बुडवले. त्याचा मृतदेह पाण्याबाहेर येऊ नये म्हणून त्याच्या उजव्या पायाच्या मांडीला दगड-मातीचा मोठा ढेकूळ बांधून त्याची हत्या केली. तळोजा भागातील एका तलावात एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह तरंगत असल्याची माहिती नवी मुंबई पोलीस नियंत्रण कक्षाला मिळताच तळोजा पोलीस घटनास्थळी पोहचले. पोलिसांनी तलावातील तो मृतदेह बाहेर काढण्यात आला. मृतदेहाची पाहणी केल्यानंतर या तरूणाची कुणीतरी अज्ञात आरोपींनी हत्या केल्याचे पोलिसांच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. यानंतर तळोजा पोलिसांनी खूनाचा गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली. परिमंडळ-२ चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील व सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन भोसले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक काशिनाथ चव्हाण, पोलीस निरीक्षक संजय नाळे, सहायक पोलीस निरीक्षक विशाल राजवाडे, पोलीस उपनिरीक्षक अस्लम पटेल व पथकाने तपास सुरू केला. मयत इसम आणि घोट गावात राहणारा राहूल विलोग यांची मैत्री असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यांच्यात काहीतरी बिनसले असल्याची ही माहीती पोलिसांना मिळाली होती. तपास पथकाने हाच धागा पकडून राहूलला चौकशीसाठी ताब्यात घेतले. सुरुवातीला राहूल तोंड उघडत नव्हता. राहूल काहितरी लपवत असल्याची खात्री पटताच पोलिसांनी खाकी वर्दीचा इंगा दाखवताच राहूलने तोंड उघडले. आणि त्याने खूनाची कबूली दिली. आता तळोजा पोलीस राहूलच्या दोन सहकारी रतिश बराईक आणि राजू लोहरा यांचा शोध घेत आहेत. पोलिसांनी या गुन्ह्य़ात अथक परिश्रम घेत, या खुनाचा उलगडा केला.

### दारुच्या नशेत त्यांच्याकडून भलतेच...

अकरा वाजता संदीप पायी पायी चालत भुसावळच्या लिंपस क्लब नजीक रिक्षा स्टॉपजवळ आला. जवळच असलेल्या हनुमान मंदीराजवळून तो पायी पायी पुढे गेला. त्याठिकाणी अजय अशोक पाठक, पंकज संजय तायडे व आशिष श्रीराम जाधव हे तिघे मित्र मद्यप्राशन करत बसले होते. मद्याच्या नशेत तिघा मित्रांच्या गप्पा चांगल्याच रंगल्या होत्या. मद्याच्या नशेत तिघे मित्र जणूकाही जगाचे बादशहा झाले होते. आपण म्हणजे कोण? असा प्रश्न जणू काही तिघा मित्रांना पडला होता. मद्याचा अंमल त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात झालेला होता. त्यांची देहबोली आणि नजर ते मद्याच्या नशेत डुंबले असल्याचे सांगून जात होती. या तिघा मित्रांच्या जवळून संदीप एकनाथ गायकवाड जात होता. रस्त्याने जात असतांना सहज त्याचे लक्ष तिघा मित्रांकडे गेले. रस्त्याने जात असतांना आपल्याकडे रोखून का पाहिले? असा सुर अजय पाठक याने संदीप गायकवाड यास बघून आवळला. त्याच्या पाठोपाठ मद्याच्या नशेतील पंकज तायडे व आशिष जाधव या दोघांनी देखील अजय पाठक याच्या सुरात सुर मिसळत संदीप गायकवाड यास शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. तिघे मद्यपी आपल्याला शिवीगाळ करत असल्याचे बघून संदीपने सुरुवातीला त्यांना समजावण्याचा सुर घेतला. मात्र आमच्याकडे का पाहिले. तुला तुझे काम करता येत नाही का? असा सुर तिघा मित्रांनी आवळला. अतिशय क्षुल्लक कारणावरुन तिघा मद्यपींनी संदीप यास खालच्या दर्जाची शिवीगाळ सुरु केल्यामुळे संदीप चिडला. त्यानेदेखील तिघांना शाब्दीक मार देण्यास सुरुवात केली. शब्दामागे शब्द वाढत होता. एका बाजुने तिघे मद्यपी व दुसऱ्या बाजुला संदीप गायकवाड हा एकटा होता. तिघा मद्यपींना समजावण्याची ती वेळ नव्हती. ते समजुन घेण्याच्या अवस्थेत देखील नव्हते. तरी देखील संदीपने आपली शक्ती पणाला लावून त्यांना शब्दांचा मार देण्यास सुरुवात केली. मात्र तिघांसमोर एकटा संदीप कमी पडला. तिघा मित्रांच्या मनावर मद्याची झिंग मोठ्या प्रमाणात चढली होती. तिघे जण मद्याच्या आहारी गेले होते. त्यातच त्यांच्या अंगी बळ देखील आले होते. आमच्याकडे रोखून का पाहिले एवढे क्षुल्लक कारण पुढे करत तिघे जण एकट्या संदीपवर तुटून पडले. जवळच पडलेल्या दगडाने त्यांनी एकट्या संदीपला मोठ्या प्रमाणात ठेचून काढले. संदीपच्या डोक्यावर, तोंडावर, मानेवर आणि नाकावर दगडाचा मोठ्या प्रमाणात मार पडल्यामुळे संदीप जणूकाही धारातिर्थी पडला. संदीप जमीनीवर कोसळल्यानंतर त्याची हालचाल काही वेळातच बंद झाली. संदीपने या जगाचा निरोप घेतल्याचे समजताच तिघांची हवा गुल झाली. तिघांच्या मनासह शरीरावरील मद्याचा अंमल मोठ्या प्रमाणात उतरला. तिघांनी तेथून पळ काढला. दुसऱ्या दिवसापर्यंत संदीपचा मृतदेह तेथेच पडून राहिला. १३ एप्रिल हा मराठी नववर्षाचा गुढी पाडव्याचा दिवस उजाडला. या दिवशी सकाळीच रेल्वे सुरक्षा बलाच्या जवानास संदीपचा मृतदेह आढळून आला. दगडाने ठेचला गेल्यामुळे मरण पावलेला संदीप गायकवाड हा रेल्वे सुरक्षा बलाच्या त्या जवानाच्या दृष्टीने अनोळखी होता. त्या जवानाने तातडीने भुसावळ शहर पोलिस स्टेशन गाठले. ड्युटीवरील ठाणे अंमलदारास त्या जवानाने तरुणाच्या खूनाची व मृतदेहाची माहिती प्रत्यक्ष हजर राहूनदिली. ठाणे अंमलदाराने लागलीच ती माहिती पो.नि.बाबासाहेब ठोंबे यांना कळवली. पो.नि.बाबासाहेब ठोंबे यांनी आपले वरिष्ठ असलेले डिवायएसपी सोमनाथ वाघचौरे तसेच सहायक पोलिस अधिक्षक अर्चित चांडक यांना कळवली. तरुणाचा खून झाल्याची माहिती समजताच क्षणाचाही विलंब न लावता सर्व अधिकारी आपल्या सहकारी कर्मचारी वर्गासह घटनास्थळी दाखल झाले. रात्रभर संदीप गायकवड याचा मृतदेह घटनास्थळावर पडून होता. मराठी नववर्षाच्या पहाटे सुर्याची किरणे त्याच्या मृतदेहावर पडली होती. त्याला बघण्यासाठी आजुबाजूच्या परिसरातील लोकांची गर्दी जमली होती. पोलिस अधिकारी वर्गाचा ताफा घटनास्थळी दाखल होताच बघ्यांची गर्दी तातडीने बाजुला झाली. मयत हा पोलिसांसह सर्वाच्या दृष्टीने अनोळखी होता. मयताच्या डोक्यावर, तोंडावर, नाकावर व मानेवर जबर दुखापत झाली होती. त्याला दगडाने जबर मारहाण झाल्याचे स्पष्ट दिसत होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पो.नि. बाबासाहेब ठोंबे व त्यांचे सहकारी स.पो.नि. संदीप दुनगहू यांना तपासकामी महत्वाच्या सुचना दिल्या. घटनास्थळी ठसे तज्ज्ञांसह श्वान पथकाची मदत घेण्यात आली. मयतावर हल्ला करणारे एकापेक्षा अधिक तरुण असल्याचे व त्यांनी कोणत्यातरी वादातून हा हल्ला केल्याचे प्रथमदर्शनी कयास लावण्यात आला. घटनास्थळासह मृतदेहाचा पंचनामा करण्यात आला. दरम्यान जमलेल्या लोकांकडे पोलिस पथकाची चौकशी सुरु असतांना मयत हा प्रमोद गायकवाड या तरुणाचा भाऊ असल्याचे चर्चेतून उघड झाले. या माहितीच्या आधारे प्रमोद गायकवाड या तरुणाला घटनास्थळावर बोलावण्यात आले. त्याने मृतदेह बघताच ओळखला. तो मृतदेह त्याचा भाऊ संदीप गायकवाड याचा होता. आपल्या भावाचा मृतदेह बघून त्याने ओक्साबोक्सी रडण्यास सुरुवात केली. या घटनेची माहिती मिळताच काही वेळाने मयत संदीपच्या पत्नीसह त्याचा मुलगा व मुलगी असे तिघे जण हजर झाले. संदीपचा मृतदेह बघून त्याच्या पत्नीने व मुलांनी धाय मोकलून रडण्यास सुरुवात केली. या प्रकरणी मयत संदीप गायकवाड याच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीनुसार भुसावळ शहर पोलिस स्टेशनला खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न.५५/२१ भा.द.वि. ३०२ नुसार दाखल करण्यात आला. एकंदरीत मयताची ओळख पटली होती. मात्र त्याचा खून कुणी व कशासाठी केला याचे उत्तर तपासात शोधून काढण्याचे कसब पोलिसांना लावायचे होते. त्या दृष्टीने तिन पथके नियुक्त करुन ती तपासकामी रवाना देखील झाली होती. शव विच्छेदनकामी मृतदेह जळगाव सामान्य रुग्णालयात रवाना करण्यात आला. दरम्यान गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार अजय अशोक पाठक या तरुणाचे नाव पुढे आले. घटनेच्या वेळी अजय पाठक हा त्याच्या साथीदारांसह मद्यप्राशन करत असल्याचे चौकशीत व खबऱ्याने दिलेल्या माहितीत समोर आले. माहिती मिळताच पो.नि. बाबासाहेब ठोंबे यांनी अजय पाठक रहात असलेल्या आयुध निर्माणी वसाहतीत जाण्याचे ठरवले. त्याच्याकडे जाण्यासाठी त्यांनी साध्या वेशात सरकारी वाहनाऐवजी खासगी चारचाकी वाहनाने जाण्याचे ठरवले. पो.नि.बाबासाहेब ठोंबे यांनी आपले सहकारी स.पो.नि. संदीप दुनगहू, हवालदार राजेश बोदडे, सोपान पाटील, जुबेर शेख यांच्यासह खासगी वाहनाने साध्या वेशात अजय पाठक रहात असलेले त्याचे निवासस्थान गाठले. त्यावेळी अजय पाठक सहज त्यांच्या हाती लागला. चौकशी करत त्याला वाहनात बसवण्यात आले. त्याला पोलिस स्टेशनला आणल्यानंतर पो.नि. बाबासाहेब ठोंबे व स.पो.नि.संदीप दुनगहू यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने त्याला पोलिसी खाक्या दाखवला. काही वेळातच तो पटापट बोलू लागला. त्याने चौकशीत आपल्या दोघा साथीदार मित्रांची नावे कबुल केली. त्याने दिलेल्या माहितीनुसार क्रमाक्रमाने आशीष श्रीराम जाधव (द्वारका नगर आंबेडकर शाळेच्या मागे भुसावळ) व पंकज संजय तायडे (रा. रामनगर सब स्टेशनच्या मागे भुसावळ) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. सुरुवातीला तिघांची वेगवेगळी चौकशी करण्यात आली. तिघांनी आपला गुन्हा कबुल केला. वैद्यकीय चाचणीनंतर तिघांना अटक करण्यात आली. तिघांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने सुरुवातीला तिघांना पोलिस कोठडी सुनावली. पोलिस कोठडीदरम्यान तिघांनी आपला गुन्हा कबुल करत हकीकत कथन केली. मद्यप्राशन करत असतांना तिघांनी रस्त्याने जाणाऱ्या संदीप गायकवाड याच्यासोबत आमच्याकडे का पाहिले या किरकोळ कारणावरुन वाद घातला होता. शब्दामागे शब्द वाढत गेल्यानंतर रागाच्या भरात व मद्याच्या नशेत तिघांनी मिळून संदीपला दगडाने ठेचून मारले. या मारहाणीत संदीपचा मृत्यू झाला. त्यानंतर तिघे मित्र तेथून पळून गेले. या घटनेतील तिघे मित्र मयतास ओळखत नव्हते तसेच त्यांच्यात कोणताही जुना वाद नव्हता. अटकेतील तिघा तरुणांवर यापुर्वी कोणताही गुन्हा दाखल नव्हता. केवळ किरकोळ कारणातून मद्याच्या नशेत त्यांच्याकडून हे कृत्य झाले. पोलिस अधिक्षक डॉ. प्रविण मुंडे, अप्पर पोलिस अधिक्षक चंद्रकांत गवळी, डिवायएसपी सोमनाथ वाघचौरे, सहायक पोलिस अधिक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि.बाबासाहेब ठोंबे, स.पो.नि.संदीप दुनगहू, पो.हे.कॉ. राजेश बोदडे, अनिल चौधरी, मोहम्मद वली सैय्यद, संजय सोनवणे, विकास बाविस्कर, सोपान पाटील, जुबेर शेख, विशाल साळुंखे, जाकीर मंसुरी, विकास सातदिवे, कृष्णा देशमुख यांनी गुन्हा उघडकीस आणला.

### अनैतिक संबंधात यशोदाचा तोल ...

त्याने आपल्या संसाराचे हित लक्षात घेत सुरुवातीला पत्नी यशोदाला समजाऊन सांगीतले. मात्र दिर शिवाजीच्या प्रेमात भरकटलेली व बहकलेली यशोदा ऐकून व समजून घेण्याच्या मनस्थितीत नव्हती. त्यामुळे तिचा पती रघुनाथ मनातून चिडला होता. त्याने यशोदाला वेळोवेळी मारहाण करण्यास सुरुवात केली होती. एके दिवशी तिने हा प्रकार तिचा दिर शिवाजीच्या कानावर टाकला. आपल्या प्रेमात अडथळा ठरणारा रघुनाथचा काटा काढण्यचे त्याने मनोमन ठरवले. याकामी यशोदाची मदत घेण्याचे त्याने ठरवले होते. ठरल्यानुसार शिवाजीने रघुनाथला गोड बोलून त्याच्या शेतातील फिल्टर प्लँटवर रात्री झोपण्यासाठी नेले. रघुनाथ पाण्याच्या शेडमध्ये झोपलेला असताना शिवाजीने गुपचूप यशोदाला फोन करुन सांगितले की रघुनाथ हा शेतात झोपलेला आहे. आपण दोघे मिळून आज त्याला संपवून टाकू. मी तुला घेण्यासाठी येतो, तु तयार रहा. त्यानंतर यशोदाला घेण्यासाठी शिवजी त्याच्या मोटारसायकलने तिला घेण्यास गेला. तिला सोबत घेत त्याने पुन्हा त्याचे शेत गाठले. रघुनाथ गाढ झोपला असल्याची दोघांनी पुन्हा पुन्हा खात्री करुन घेतली. त्यानंतर शिवाजीने शेतातील शेडच्या बाजुला पडलेल्या दगडाने व यशोदाने काठीने रघुनाथला बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. झोपलेल्या रघुनाथच्या डोक्यावर मारुन दोघांनी त्याचा जागीच खून केला. तो मरण पावला असल्याची दोघांनी वारंवार खात्री केली. रघुनाथ मरण पावल्याची खात्री झाल्यानंतर दोघांनी त्याला ओढत नेऊन घोंगडे यांच्या शेतात नेले. तेथेच टिकाव व फावड्याने खड्डा करुन त्याचा मृतदेह दोघांनी मिळून पुरुन टाकला. काही दिवसांनी शेतमालक वाल्मिक घोंगडे यांना त्यांच्या शेतातील जमीनीच्या खड्ड्यात एक कुजलेला मानवी सांगाडा असल्याचे लक्षात आले. त्या कुजलेल्या मृतदेहाची दुर्गंधी देखील परिसरात पसरण्यास सुरुवात झाली होती. या घटनेची माहिती पैठण पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळताच पैठण पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.भागवत फुंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अवघ्या चोवीस तासात आपल्या कौशल्याचा वापर करत मृतदेहाची ओळख पटवली. रघुनाथ घोंगडे हा गावात कुठेही आढळून आला नव्हता. त्याची पत्नी यशोदा हिचे वर्तन देखील संशयास्पद दिसून आले होते. नात्याने दिर असलेल्या शिवाजी घोंगडे याच्यासोबत तिचे अनैतीक संबंध असल्याची माहिती पोलिस पथकाने मिळवली होती. पोलिस पथकाने सुरुवातील शिवाजी जगन्नाथ घोंगडे याला चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले. त्याला अगोदर प्रेमाने व नंतर पोलिसी खाक्या दाखवून विचारणा केली असता त्याने आपला गुन्हा कबुल केला. त्याने त्याची भावजय यशोदा रघुनाथ घोंगडे हिच्या मदतीने रघुनाथ घोंगडे याचा खून केला असल्याची कबुली दिली. त्यामुळे यशोदा घोंगडे हिला देखील चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले. दोघांनी आपला गुन्हा कबुल केल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. अनैतिक संबंधात अडथळा येत असल्याने रघुनाथ घोंगडे याचा त्याची पत्नी यशोदा व चुलत भाऊ शिवाजी घोंगडे यांनी खून केल्याचे निष्पन्न झाले. अवघ्या चोवीस तासात या खूनाचा उलगडा लावण्यात पोलिस पथकाला यश आले. धोंगडेची पानी व चुलत भावाने हा खून केल्याचे उघड झाले. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने मृतदेह सापडल्यानंतर अवघ्या चोवीस तासात मृतदेहाची ओळख पटवून आरोपींना गजाआड केले. यशोदा रघुनाथ घोंगडे (२५) रा. धनगर गल्ली, बालानगर ता. पैठण जि. औरंगाबाद व शिवाजी जगन्नाथ घोंगडे या दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सुरुवातील त्यांना पोलिस कोठडी सुनावली. त्यानंतर पुन्हा न्यायालयात हजर केले असता न्यायलयीन कोठडी सुनावली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक भागवत फुंदे, पोलीस उप निरिक्षक संदीप सोळंके, पो.हे.कॉ. प्रमोद खांडेभराड, किरण गोरे, पो.ना. नरेंद्र, संजय भोसले, पो.कॉ. संजय तांदळे, पो. कॉ.देवरे यांनी या गुन्ह्याच्या तपासकामी सहभाग घेतला.

### रेखाच्या व्याभिचाराला सासरीही फुटल्या ...

तिच्यामुळे तिच्या आई वडिलांची बदनामी होत होती. तिचे लवकरात लवकर लग्न लावून देऊन तिचे हात पिवळे करण्याचा त्यांनी विचार केलेला होता. त्यातूनच त्यांना रामू शेडमाके याचे स्थळ सांगून आले. मुलगा चांगला आणि सुस्वभावी असल्याने रेखाच्या आई वडिलांनी आणि भावाने तिचे लग्न समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे त्याच्याशी लावून दिले. लग्नानंतर सुधारेल तिच्या वागण्यात बदल घडेल असे तिच्या घरच्या लोकांना वाटत होते. लग्नापूर्वी आपल्या पत्नीचे म्हणजे रेखाचे गावातील तरूणाच्याबरोबर प्रेमसंबंध असल्याची माहिती रामू याला नव्हती. ती दिसायला जेवढी देखणी होती तेवढीच ती चालू होती. तिला परपुरूषाबरोबर बोलायला, त्याच्याशी गप्पा मारायला आवडत होते. त्यातूनच ती सासरी ही आपल्या शेजारील तरूणांच्याबरोबर कायम दिलखुलासपणे बोलत होती. तिला परपुरूषाची चटकच लागलेली होती. आपली पत्नी शेजारच्या तरूणांच्या बरोबर बिनधास्त बोलते. त्याच्याशी गप्पा मारते या गोष्टीचा राग रामू शेडमाके याला येत होता. त्याला कारण ही तसेच होते. कारण तिच्या अशा दिलखुलास आणि मनमोकळ्या वागण्याचा वेगळाच अर्थ रामुचे मित्र आणि शेजारी लावत होते. ती चालू असल्याचे समजून रामूचे मित्र तिला वहिनी वहिनी म्हणत तिच्या मागे लाळ घोळीत फिरत होते. अशा महिलांना कसे आपल्या अंगाखाली घ्यायचे हे बाहेरख्याली पुरूषांना चांगले माहित असल्याने ते ही मुद्दामच तिच्याशी चावट गप्पा मारत होते. तिच्या अंगचटीला जात तिला चोरटा स्पर्श करीत होते. ती ही त्याना बिनधास्त आपला दरवाजा उघडून दाखवत होती. त्यातच ती अलिकडे नवऱ्याच्या एका मित्राला त्या संबंधातून चिकटली. त्याने ही तिचा गैरफायदा घेत तिला आपल्या अंगाखाली घेऊन मजा मारली असल्याने अलिकडे तो तिची गावभर बदनामी करत होता. तो आपल्या जवळच्या मित्रांना ती चालू आहे, तिला पैशाची लालूच दाखवली की ती मजा मारायला देते असे सांगून तो तिची बदनामी करत होता. तिचा स्वभावच चंचल असल्याने व तिच्या मनात काही नसल्याने ती नवऱ्याच्या मित्राबरोबर तसेच इतरांच्याबरोबर बिनधास्त हसत खेळत बोलत होती. रामुच्या मित्राने तिची बदनामी केल्याने गावात त्या दोघांच्या संबंधाची चर्चा होऊ लागली तशी ती चर्चा रामुच्या कानावर ही आली. त्याने याबाबतचा जाब पत्नी रेखा हिला विचारला असता तिने ही कळत न कळतपणे आपल्या त्या संबंधाची कबुली नवऱ्याला दिली होती. याचा राग त्याला आलेला होता. आपली पत्नी बिघडलेली असून ती चालू आहे त्यामुळे गावात आपली बदनामी होत आहे याची कल्पना त्याने रेखाच्या वडिलांना म्हणेजे विलास मरापे आणि तिचा भाऊ हिरामण मरापे यांना दिली होती. तिच्या अशा वागण्याबद्दल तिच्या वडिलांनी आणि भावाने ही तिला समजावून सांगितले होते. परंतू तरीही तिच्या वागण्यात कोणाताच फरक पडला नव्हता. उलट ती दिवसे दिवस जास्तच नवऱ्याच्या त्या मित्राबरोबर गुलछर्रे उडवित होती. यातून तिच्या नवऱ्याची जास्तच बदनामी होत होती. गावात अशा घटनेचा बोभाटा व्हायला वेळ लागत नाही तसेच या घटनेचे ही झाले होते. तिच्या अशा बदफैली आणि चालू वागण्याने तिच्या नवऱ्याला गावात तोंड दाखवायला ही जागा राहली नव्हती. म्हणून तो तिच्यावर चिडला होता. तो तिच्याबरोबर भांडण काढून तिला मारहाण करीत होता. त्याचा नाद सोड म्हणून तिला सांगत होता. पण ती त्याचे काहीच ऐकत नव्हती. रेखा ही सांगून ही ऐकत नसल्याने त्याने परत तिच्या अशा वागण्याची कल्पना तिच्या वडिलांना आणि भावाला दिली होती. तो त्याच्याकडे रेखाला कायमचे सोडून देतो मला मोकळीक दया असे सांगत होता. तुमच्या मुलीचे लग्नाअगोदरपासून अनेकांच्याबरोबर लफडे होते. तुम्ही मला फसवले आहे. ती चांगल्या वळणाची नव्हती आणि आजही नाही त्यामुळे गावात मला तोंड दाखवयाला आणि रहायला ही नको वाटत आहे. तिच्यामुळे माझी अब्रुच गेली आहे. असे म्हणून तो तिला नादावायला ही तयार नव्हता. आता रेखाच्या आई वडिलासमोर चांगलाच पेच प्रसंग निर्माण झालेला होता. त्यांनी ही तिला समजावून सांगून चार शहाणपणाच्या गोष्टी सांगितल्या होत्या. पण त्याचे सांगणे हे पालथ्या घडयावरचे पाणी असल्यासारखेच होते.उलट ती दिवसे दिवस जास्तच बदफैलीपणाने वागू लागली होती त्यामुळे तिचे वडिल आणि भाऊ ही तिच्यावर चिडले होते. ती सांगून ही सुधारणार नाही याची त्यांना खात्री झालेली होती. त्यातच जावाई याने त्याना रेखाला सोडून देण्याची भाषा केली असल्याने आणखीन बदनामीत भरच पडणार होती. कारण लग्नाअगोदरपासून रेखा ही चंचल आणि बिनधास्त वागत आहे याची माहिती भावकीत आणि गावातील लोकांना होती. म्हणून त्यांनी आता जावाई रामू शेडमाके याला हाताशी धरून रेखालाच कायमची अद्दल घडवायची हे त्यांनी ठरविले होते. त्यांनी रेखाला आपण मारून टाकूया आणि मग तू दुसरे लग्न कर असा सल्ला दिला होता. रेखाला मारायचे पण त्या गुन्हयात आपण अडकायचे ही नाही असा त्या तिघांनी प्लॅन केला होता. त्याप्रमाणे त्यांनी नियोजन ही केले होते. रेखाचे वडिल विलास मरापे हे पेंढरी येथील विठ्ठल मेश्राम यांचे शेत मक्त्याने केले होते. त्या शेतात शुक्रवार दि.९ एप्रिल २०२१ रोजी रेखाच्या वडिलांनी म्हणजे विलास मरापे यांनी रेखाला रात्री १० वाजणेच्या सुमारास त्यांनी गोड बोलून बोलावून घेतले. तेथे अगोदरच तिचा नवरा रामू शेडमाके व भाऊ हिरामण मरापे हे होते. त्या तिघांनी मिळून तिच्याकडून तिच्या स्वहस्ताक्षरात एक चिठ्ठी लिहून घेतली. त्यांनतर तिला मारहाण करीत तिचा दोरीने गळा आवळला त्या तिघांच्या ताकदीपुढे तिच्या एकटीचे काहीच चालले नाही. क्षणार्धात ती टाचा घासत जागीच मयत झाली. त्यांनंतर त्या तिघांनी तिच्या हाताला कापडी पट्टी बांधून त्यामध्ये तिने लिहिलेली चिठ्ठी ठेवली आणि तिचा मृतदेह ओढत नेऊन जवळच असलेल्या विहिरीत ढकलून दिला. त्यांनतर काही झालेच नसल्याच्या अविर्भावात घरी निघून गेले. रेखाचा खून करून त्यांनी पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या दिवशी नेहमी प्रमाणे विलास मरापे आणि भाऊ हिरामण मरापे हे दोघे ही आपआपल्या कामात काहीच घडले नाही अशा नाटमय पध्दतीने वागून लोकांची दिशाभूल करीत राहिले होते. रविवार दि.११ एप्रिल रोजी पेंढरी येथील विहिरीत एका महिलेचा मृतदेह पाण्यात तरंगत असल्याचे दिसून आल्यावर याची माहिती पांढरकवढा पोलीसांना देण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी गावऱ्याच्या मदतीने त्या महिलेचा मृतदेह बाहेर काढून त्याचा रितसर पंचनामा केला. मृत महिलेच्या हाताला एक कापडी पट्टी बांधलेली व त्यामध्ये एक सीम व एक चिठ्ठी लिहिलेले पोलीसांना मिळून आले. पोलीसांनी ते ताब्यात घेऊन मयत महिलेची ओळख रेखा रामु शेडमाके अशी पटविलेली होती. मयताची ओळख पटल्यावर पोलीसांनी तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पांढरकवडा येथील शासकीय रूग्णालयात पाठवून दिला. मयत रेखा हिच्या शवविच्छेदननाच्या अवहालात तिचा गळा आवळून मृत्यू अशी नोंद होती. यावरून पोलीसांनी तिचा खून करून पुरावा नष्ट करण्याचा कुणी तरी प्रयत्न केला असल्याची शंका व्यक्त करून तपसाला सुरूवात केली. याकामी पोलीसांनी तांत्रीक दृष्टया तपासला सुरूवात केली होती. तसेच आपल्या गुप्त खबऱ्यांना ही कामाला लावले होते. गुप्त खबऱ्यांनी दिलेल्या माहितीवरून मयत रेखा हिचे गावातील मुकेश उर्फ देवेंद्र कनाके याच्याबरोबर विवाहबाहय संबंध असल्याची माहिती मिळाली होती. म्हणून पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता. त्याचा रेखाच्या खूनाशी काहींच संबंध नसल्याचे पुढे आले. म्हणून पोलीसांनी त्याला चौकशी करून सोडून दिले होते. त्यानंतर पोलीसाच्या संशयांची सुई मयत रेखा हिचा पती रामु शेडमाके याच्यावर स्थिरवली होती. पोलीसांनी त्याला चौकशीसाठी ताब्यात घेऊन या घटनेची चौकशी पोलीस त्याच्याकडे करीत असताना तो ना चा पाढा वाचत होता. त्याच्या बोलण्यात ही पोलीसांना विसंगती आढळून येत होती. पोलीसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखवताच त्याने आपला गुन्हा कबुल करून मयत रेखा हिचे वागणे बदफैली असल्याने व तिच्या वागण्याने समाजात आमची अब्रु जात असल्याने मी, व रेखाचे वडिल विलास मरापे आणि तिचा भाऊ हिरामण मरापे यांनी तिचा दोरीने गळा आवळून खून करून तिच्या हस्ताक्षरात चिठ्ठी लिहून तिचे प्रेत पेंढरी येथील शिवारातील विहिरीत टाकले असल्याची कबुली दिली. त्याच्या कबुलीनुसार पोलीसांनी मयत रेखा हिचे वडिल विलास मरापे व भाऊ हिरामण मरापे यांना ही ताब्यात घेतले. त्यांनी ही आपल्या गुन्हयाची कबुली पोलीसासमोर दिली. या घटनेची फिर्याद पांढरकवडा पोलीस ठाण्यात हवालदार राहूल खंडागडे यांनी दिली. त्याच्या फिर्यादीनुसार पोलीसांनी रेखा रामू शेडमाके (वय २८) हिचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी जावाई सुभाष मडावी. रा. पहूर ता.कळंब वडिल विलास मरापे. भाऊ हिरामण मरापे यांच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याना न्यायालयात उभे केले असता. मा.न्यायालयाने त्यांना १६ एप्रिल २०२१ पर्यतची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा तपास पोलीस अधिक्षक डॉ.दिलीप भुजबळ,अपर पोलीस अधिक्षक प्रदिप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रामकृष्ण महल्ले स.पो.नी. भरत चपाईतकर, स.पो.नी.हेमराज कोळी, पोलीस उपनिरीक्षक संदीप बारींगे, पोलीस उपनिरीक्षक निलेश गायकवाड यांनी केला. विवाह बाहय संबंधात महिला जर अडकली तर ती कुणाचेच काही ऐकत नाही. ती आपले तेच म्हणने खरे करून कशी ही वागत राहते याचाच राग तिच्या घरच्या लोकांना येत असतो ती सांगून ही सरळ नीट वागत नसल्याने त्यांची समाजात आणि गावात इज्जत जात असल्याने ती नको ती असली ब्याद म्हणून तिला कायमचीच देवाघरी पाठवतात. खून करून पुराव नष्ट करण्यासाठी म्हणून ही ते वाटेल त्या थराला जात असतात. त्यातच अलिकडे मालिका आणि चित्रपटात दाखविल्या प्रमाणे खून करून आपण त्यांतून सुटू शकतो असे त्यांना वाटत असते. म्हणूनच ते असे टोकाचे पाऊल उचलतात आणि एखाद्या खूनाच्या घटनेत अपसुक अडकतात हेच या घटनेवरून दिसून येते.

### प्रियकरासाठी तिने सुखी संसाराचा...

हिला भेटायला येत होता. तो भेटायला आला म्हणजे मनीषा ही खुश असायची. दुपारच्यावेळी गल्लीत कुणी नसल्याने बंद दारा आड तो तिची रसरशीत जवानी लुटत होता. त्यामुळे त्या दोघांच्या त्या संबंधाची चर्चा ही गल्लीत आणि भीमाच्या मित्रात होऊ लागली होती. ही चर्चा भीमाच्या कानावर ही आली होती. तो त्या दोघांच्यावर नजर ठेवून होता. त्या दोघांना तो रंगेहात पकडू इच्छित होता. तशा संधीच्या शोधात तो होता. आपली पत्नी दुसऱ्या परपुरूषाला चिकटली आहे.त्याला आपल्या अंगावर खेळवते या गोष्टीचा राग त्याला येत होता. त्यातूनच तो पत्नी मनिषा बरोबर दररोज भांडण काढून तिला मारहाण ही करीत होता. पण ती घट्ट चामडयाची असल्याने त्याचा जबर मारहाण सहन करून ही ती प्रियकर आनंदाचा नाद सोडत नव्हती. उलट ती नवऱ्यालाच तुम्ही बाहेरच्या लोकांच्यावर विश्वास का ठेवता? म्हणून भांडत होती. याचा सोक्षमोक्ष लावायचाच हे भीमाने ठरवले होते. तो नेहमी सकाळी कामावर गेला कीं संध्याकाळी उशिराच रात्री घरी परत येत होता. याची कल्पना मनिषा आणि तिच्या प्रियकराला होती. एकदा दुपारच्या वेळी आनंदा हा मनीषाला भेटायला आला. त्यावेळी गल्लीत आणि शेजारी सामसुम होती. तो आल्यावर तिने दरवाजा बंद करून घेतला होता. घरच्या बेडवर त्या दोघांचा रोमान्स चालू होता. त्या दोघांचा तो खेळ रंगात आला असताना अचानाक दरवाजावर थाप पडली. पण त्याचा आवाज त्यांना ऐकू आला नाही. ते दोघे ही इष्काच्या खेळात रंगले होते. दरवाज्यावर थाप मारून ही दरवाजा उघहत नसल्याने भीमाने घराच्या मागील बाजूच्या दरवाज्याने घरात प्रवेश केला तर बेडवरती त्याची पत्नी मनिषा आणि तिचा प्रियकर आनंदा याचा नागडा खेळ चालू होता. त्या दोघांना त्या अवस्थेत पाहून त्याचे पित्तच खवळले होते. तो त्याच्यावर ओरडत होता. त्यावेळी त्यांनी कसा बसा आपला तो कार्यक्रम आटोपून कपडे घातले त्यावेळी भीमा आनंदाच्या अंगावर धावून त्याला मारायला गेला होता. पण मनीषाने त्याला आडवून धरत त्याला तेथून पळून जायला मदत केली होती. त्यानंतर भीमाने पत्नीला जबर मारहाण करून परत जर त्या आदंयाच्या नादाला लागलीस तर तुला जिंवतच सोडत नाही अशी धमकी दिली होती. ते दोघे ही रंगेहात सापडल्याने तिने त्याचा मार सहन केला होता. तरीही ती त्याच्याबरोबर भांडणात त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवीत तुझ्यात दम नाही तू रात्रीच्या खेळात सुख देऊ शकत नाहीस असे बोचटपणे बोलून त्याला गप्प बसविले होते. आता पत्नीच्या अशा स्वैर वागण्याने भीमा जास्तच दारू पिऊ लागला होता. तो आता सकाळ रात्री दारू पित होता. दारू पिऊन येऊन तो या कारणातून पत्नी मनिषा हिला मारहाण करीत तू रांड आहेस अशी अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत होता. तू मला फसवले आहेस माझ्या मागे त्याला आपल्या अंगावर घेतेस आणि मला मात्र उपाशी ठेवतेस असे म्हणून तो तिच्यावर जास्तच चिडत होता. तर मनिषाला ही नवरा भीमाचा राग येत होता. त्याच्यामुळे आता तिला पूर्वीसारखे आनंदाला भेटता येत नव्हते. त्याच्याकडून पाहिजे तसे सुख तिला मिळत नव्हते. त्यातच नवऱ्याचा मारहाण आणि त्रास जास्तच झाला होता. म्हणून मनिषा आणि तिचा प्रियकर आनंदा यांनी त्याच्या संबंधात अडसर ठरणाऱ्या भीमाचा कायमचा काटा काढणेचे ठरवले होते. तसा प्लॅन ही त्यांनी केला होता. त्याला मारायचे पण त्याने आत्महत्या केल्याचे भासवायचे असा त्यांनी प्लॅन केला. सोमवार दि.१९ एप्रिल रोजी भीमा ढाणे हे घरगुती कामासाठी घराबाहेर पडले. ते रात्री उशिरापर्यंत घरी परत आले नाहीत. कुठल्या तरी मित्राकडे गेले असतील म्हणून त्याच्या घरच्या लोकांनी त्या रात्री त्याची वाट पाहून झोपी गेले. दुसऱ्या दिवशी ते परत आले नाहीत म्हणून भीमा ढाणे यांच्या चलूत भावाने मंगळवेढा पोलीसात आपला भाऊ भीमा सदा ढाणे (वय ५२) रा.मंगळवेढा हे बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. पोलीस ही बेपत्ता भीमा ढाणे याचा शोध घेत होते. दि.२१ एप्रिल २०२१ रोजी दुपारी १ वाजणेच्या सुमारास मंगळवेढा-सोलापूर रस्त्यावरील हरी बाबु घाटूळ याच्या शेतातील लिंबाच्या झाडाला भीमा ढाणे याचा गळफास घेतलेल्या अवस्थेत त्याचा मृतदेह मिळून आला होता. पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन त्याचा मृतदेह खाली उतरवून घेऊन पंचनामा चालू केला असता. त्याच्या गळ्यावर कशाने तरी आवळल्याचे व्रण दिसत होते. त्यामुळे त्याच्या घातपाताचा संशय पोलीसांना आला. हरी घाटूळ याच्या शेतात भीमा ढाणे यांनी गळफास घेतल्याची फिर्याद ओकार भोसले यांनी दिली होती. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी मंगळवेढा शासकीय रुग्णालयात पाठवून दिला. शवविच्छेदनाचा रिपोर्ट ही गळयाला आवळल्याने श्वास गुदमरून मृत्यू असा होता. या आधीचा पोलीसाचा संशय हा खूनाचा होता. त्यातच शवविच्छेदनात गळा आवळल्याचा रिपोर्ट मिळाल्याने पोलींसाचा संशय अधिकच गडद झाला होता. या घटनेचा तपास मंगळवेढा पोलीसाबरोबर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस ही करत होते. त्यांनी आपल्या गुप्त खबऱ्यांना ही या कामी कामाला लावले होते. गुप्त खबऱ्याने दिलेल्या माहितीवरून पोलीस मयत भीमा ढाणे याच्या कुटूंबियाकडे चौकशी करत असताना त्यांना मयत भीमा याची पत्नी मनिषा याच्या बोलण्यात विसंगती जाणवत होती. त्यातच गुप्त खबऱ्यांनी आणि मयत भीमाच्या नातेवाईकांनी व शेजाऱ्यांनी मनिषा हिच्या विवाहबाहय संबंधाबदलची माहिती दिल्याने पोलीसांचा मनिषा हिच्यावरच संशय अधिकच बळावला होता. त्यांनी तिला पोलीस स्टेशनला बोलवून घेऊन तिला महिला पोलीसाकडून पोलीसी खाक्या दाखविला असता तिने आपला गुन्हा कबुल केला. आणि आपले विवाह बाहय संबंध आनंदा व्हनमुखे याच्याबरोबर असल्याची कबुली दिली. आपल्या त्या संबंधात नवरा भीमा ढाणे याचा अडसर ठरत असल्याने तिने व तिचा प्रियकर आनंदा या दोघांनी मिळून त्याला घटनेच्या दिवशी शेतात बोलावून घेतले होते. तेथे आनंदा याने भीमाला जास्त दारू पाजवली. तो नशेत असताना त्याने मनिषा हिला बोलावून घेतले आणि त्या दोघांनी त्याचा रस्सीने गळा आवळला. त्यातच त्याचा जागीच मृत्यू झाला. त्यांनी त्याचा खून केला असल्याने त्याचा पुरावा नष्ट करण्यासाठी म्हणून हरी घाटूळे याच्या शेतातील झाडाला त्याचा मृतदेह लिंबाच्या झाडाला गळफास घेतलेल्या स्थितीत लटकवला आणि घटनास्थळावरून ते दोघे परत फिरले. तिने आपल्या गुन्हयाची कबुली दिल्यावर पोलीसांनी या घटनेतील तिचा प्रियकर आंनदा व्हनमुखे याला ही ताब्यात घेतले होते. त्याने ही आपल्या गुन्हयाची कबुली दिली. हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सायबर शाखेचे पोलीस हवी हटकळे आणि खंडू माळी यांनी विशेष प्रयत्न केले. सुरूवातीपासूनच पोलीसांना मयत भीमा याची पत्नी मनिषा हिच्यावर संशय होता. तसेच भीमाने आत्महत्या केली नसून त्याचा खूनच केला असल्याचा संशय होता. त्या दोघांनी आपल्या गुन्हयाची कबुली दिल्याने पोलीसांनी भीमा सदा ढाणे याचा खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी मयत भीमा याची पत्नी मनिषा भीमा ढाणे(वय ४०) व तिचा प्रियकर आनंदा व्हनमुखे (वय ३८) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२, २०१ नुसार गुन्हा दाखल करून त्यांना मंगळवेढा येथील न्यायालयात शुक्रवार दि.२३ रोजी हजर केले असता.मा.न्यायालयाने त्या दोघांना सहा दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.विवाह बाहय संबंधात मनिषा ही भरकटत गेल्याने तिने आपल्या त्या संबंधात अडथळा ठरणाऱ्या नवऱ्याचा प्रियकराच्या मदतीने पध्दतशीरपणे काटा काढला होता.

### फेसबूकचा प्रियकर भामटा निघाला...

गुन्ह्य़ांचा तपास करण्यासाठी पोलीसांचे बळ कमी पडत आहे. अशाच एका घटनेत मुंबईत काम करणाऱ्या एका तरूणीला प्रेमाच्या आणाभाका देऊन झारखंड येथे बोलवून तिची आर्थिक लुट आणि तिला जबर मारहाण करण्यात आली. झारखंड येथील तरूणाबरोबर केलेले प्रेम तिच्या चांगलेच अंगलटी आले. मुंबईमध्ये नोकरी करणाऱ्या अंबिका (नाव काल्पनिक आहे) या मुलीची झारखंडमध्ये वास्तव्यास असणाऱ्या अभिषेककुमार या मुलासोबत फेसबुकवर मैत्री झाली. पुढे या दोघांमध्ये फेसबुकचॅटच्या माध्यामातून प्रेम प्रकरण सुरु होतं. दोघांमधील प्रेम आणि विश्वास वाढत गेला. अंबिका त्या तरूणाच्या प्रेमात चांगलीच गुरफटून गेली होती. प्रियकराच्या मोहापाई मुलगी इतकी वाहत गेली की ती मुंबई सोडून झारखंडला पोहचली. पण तिथे गेल्यावर तिच्या प्रियकराचा म्हणजे अभिषेकचा प्रताप पाहून ती चांगलीच हादरली. ज्या प्रियकरासाठी ती आई-वडिल, बहिण, भाऊ व इतर जवळचे नातेवाईक सोडून आली होती. परंतू तिला आता याच सर्वाची आठवण येत होती. पण स्थानिक पोलीसांनी हे प्रकरण नीट आणि काळजीपूर्वक हाताळल्यामुळे अंबिकाचे आर्थिक नुकसान टळले. परंतू तिला मानसिक त्रास मोठ्या प्रमाणात झाला. प्रियकराने तिला बेदम मारहाण करतो. तिच्या जवळील सर्व रोख रक्कम आणि दागिने हिसकावून पळून गेला होता. संबंधित पीडित मुलगी ही मुळची झारखंडच्या सिमडेगा येथील रहिवासी आहे. ही तरुणी मुंबईत नोकरी करते. या मुलीची तीन वर्षापूर्वी फेसबुकवर आरोपी मुलासोबत मैत्री झाली होती. तेव्हापासून त्यांच्यात बोलणं चालणं सुरु झालं. काही दिवसांमध्ये त्यांच्या मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं. मुलगी मुंबईत नोकरी करत असल्याने एक दिवस आरोपी मुलगाही मुंबईत दाखल झाला. मुंबईत आल्यावर दोघांमधील प्रेम अधिकच घट्ट झाले. दोघांनी एकत्र राहण्यासाठी लग्न करण्याचं ठरवलं होते. अभिषेकचा रूबाब त्याचे राहणीमान, त्याचे स्टेटस पाहून अंबिकाला वाटले की मला जसा स्वप्नातला राजकुमार हवा होता अगदी तसा राजकुमार मला मिळाला म्हणून ती त्याच्याबरोबर लग्न करायला तयार झाली. त्याच्यावर अंबिकाचा जरा जास्तच जीव जडला होता. दरम्यान, पीडित मुलीने आपल्या कष्टाच्या पैशांवर प्रियकराला बाईक गिफ्ट म्हणून घेऊन दिली. मुलीच्या बाजूने नातं खूपचं घट्ट झालेलं होतं. अभिषेक आणि त्याच्या कुटुंबियांना भेटण्यासाठी मुलगी १६ एप्रिलला मुंबईहून पाटण्याला गेली. तिथून अभिषेक तिला आपल्या घरी घेऊन जाण्याचं कारण सांगत तो तिला झारखंडच्या गोड्डा येथे घेऊन आला. मात्र, गोड्डा येथे आणल्यानंतर तो घरी घेऊन जाण्याबाबत काहीही कारणं सांगू लागला. तो गोड्डा जिल्ह्यातील धोडा गावाचा रहिवासी आहे. आरोपी अभिषेकने मुलीला घरी घेऊन जाण्यास नकार दिल्याने दोघांमध्ये खटके उडाले. तेंव्हा अंबिकाला कळाले की अभिषेक तर शीघ्रकोपी स्वभावाचा आहे. यावेळी आरोपी अभिषेकने भर बाजारात तरुणीला बेदम मारहाण केली. यावेळी बाजारातील काही लोकांनी त्याला आवरण्याचा प्रयत्न केला. मात्र, आरोपीने पती-पत्नीमधील वाद असल्याचं सांगून लोकांना दूर होण्यास सांगितलं. यावेळी काही लोक बाजूला झाले. मात्र, गंमत बघणाऱ्या काहींना संशय आला. त्यांनी तातडीने पोलिसांना फोन करुन याबाबत माहिती दिली. पोलीस येत आहेत याबाबतची माहिती मिळताच आरोपी अभिषेक घटनास्थळावरुन पळाला. मात्र, त्याआधी तो तरुणीच्या पर्समधील दीड लाख रोख रक्कम आणि दागिने घेऊन गेला. गोड्डा पोलीस ठाण्याचे पोलीस घटनास्थळी दाखल झाले. ते तरुणीला आपल्यासोबत पोलीस ठाण्याला घेऊन गेले. दरम्यान, पोलिसांनी अवघ्या काही तासात आरोपी अभिषेकला बेड्या ठोकल्या. त्याने मुलीकडून हिरावलेले सर्व पैसे आणि दागिने पोलिसांनी जप्त केले. मुलीच्या तक्रारीच्या आधारावर त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सोलापूरमध्ये महिलेचे अपहरण करून बलात्कार करणाऱ्या आरोपीला २४ तासात केले गजाआड

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर येथे अंधाऱ्या रात्री रस्त्याने जाणाऱ्या महिलेस जबरदस्तीने उचलून नेऊन मारहाण करून बलात्कार करणाऱ्या व जबरी चोरी करणाऱ्या आरोपीला सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने चोवीस तासात पकडून जेरबंद केले. दिनांक १८ एप्रिल २०२१ रोजी रात्रीच्या आठ वाजण्याच्या सुमारास यातील महिला फिर्यादी ही तिच्या अ‍ॅक्टीवा मोटार सायकलवरून सोलापूरहून कारंबाकडे जात होत्या. त्यांची मोटार सायकल ही कारंबा गावाजळील पेट्रोल पंपाजवळील भोगाव गावाकडे जाणारे कच्च्या रस्त्यालगत आली असता फिर्यादीच्या गाडील पाठीमागून बुलेट मोटार सायकलवरून तीन इसम आले. त्यांनी फिर्यादीच्या मोटार सायकलला बुलेट मोटार सायकल आडवी लावून थांबवले. तिला तेथे मारहाण करून मोटार सायकलवरून भोगाव रोडला घेवून जावून तेथे रस्त्याच्या कडेला असणारे शेतामध्ये नेऊन कानातील व गळ्यातील सोन्याचे दागिने काढून घेतले. तसेच फिर्यादी हीस मारहाण करून तिचेवर त्याच्यातील एकाने बलात्कार केला. त्यानंतर फिर्यादीस तेथेच सोडून निघून गेले होते. सदरबाबत सोलापूर तालुका पोलीस स्टेशन येथे गुरनं २००/२०२१, भादविक ३७६, ३९४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल होता. सदर गुन्हा उघडकीस आणनेकामी तेजस्वी सातपुते पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे सर्जेराव पाटील यांना सदरचा गुन्हा लक्ष घालून उघडकीस आणनेबाबत सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे पोनि सर्जेराव पाटील यांनी स्थानिक गुन्हे शााखेकडील पोलीस अंमलदार यांची तपास पथके तयार करून आरोपींचा शोध घेण्यास सुरूवात केली होती. गुन्हा हा सोलापूर शहरालगत घडला असल्याने व फिर्यादीने आरोपींचे दिलेले वर्णन व बुलेट मोटार सायकलचे वर्णन यावरून तपास पथकाने तपासाची चक्रे फिरवली. त्यामध्ये सदरचा गुन्हा देगाव येथील राहणारे मुलाने त्याचे मुंबई येथून आलेल्या मित्रासह केला असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरून पोलीस हवालदार राजेश गायकवाड यांच्या पथकाने सदर मुलाची माहिती काढून त्याचा शोध घेण्यास सुरूवात केली परंतू देगाव येथील आरोपी हा तुळजापूर रोडने गेल्याची माहिती मिळाली. त्यामुळे तपास पथकाने तुळजापूर रोडला सदर आरोपींचा शोध घेतला असता तिन्ही आरोपी मिळून आले. त्यांना गुन्हयात वापरलेल्या बुलेट मोटार सायकल क्रमांक एम.एच.१२ टी/७३८८ सह ताब्यात घेतले. त्यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे कौशल्यपूर्ण तपास करता त्यांनी फिर्यादी महिलेकडून मारहाण करून काढून घेतलेले सोन्याचे दागिने देखील मिळून आले.त्यांचेकडून गुन्हयातील गेलेला माल व बुलेट मोटार सायकल असा एकूण १,३०,००० मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील देगाव येथील राहणारा आरोपी हा विधीसंघर्शग्रस्त बालक असून त्याच्यावर सोलापूर शहरामध्ये चोरी, घरफोडी, जबरी चोरी यासारखे एकूण १७ गुन्हे दाखल आहेत. तसेच त्याचे मुंबई येथून आलेल्या सह आरोपीपैकी एक आरोपी देखील विधीसंघर्शग्रस्त बालक आहे. त्या दोघांनी मुंबई येथून सोलापूरकडे येत असताना बुलेट मोटार सायकल क्रमांक एम.एच.१२ टी/७३८८ ही पुणे येथून चोरी करून आली असल्याची माहिती त्यांनी तपासा दरम्यान दिली आहे. त्यांचेविरूध्द देखील मुंबई येथे गुन्हे दाखल असल्याची माहिती समजून आले आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे याचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांचे नेतृत्वाखाली पोह राजेश गायकवाड, पोह विजय भरले, पोह दिलीप राउत, पोना हरीदास पांढरे, पोना रवी माने, पोकॉ सचीन गायकवाड, मपोकॉ सरस्वती सुगंधी सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा ग्रामीण व सायबर पोलीस स्टेशनचे पोकॉ अन्वर आत्तार यांनी बजावली आहे.




## चार रुग्णांच्या मृत्यूची उच्चस्तरीय चौकशी व्हावी शहर जिल्हा भाजपाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**लातूर/प्रतिनिधी**

शहरातील शासकीय रुग्णालयामध्ये वीज खंडीत होऊन व्हेंटीलेटर बंद पडल्याने चार रुग्णांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेची उच्चस्तरीय चौकशी व्हावी आणि कोरोना संसर्गाच्या प्रतिबंधासाठी ज्या उपाययोजना अवलंबल्या जात आहेत त्यातील त्रुटी दूर कराव्यात या आशयाचे निवेदन शहर जिल्हा भाजपाच्या वतीने जिल्हाधिकार्यांना देण्यात आलेले आहे. कोरोना संसर्गाच्या दुसर्या लाटेने हाहाकार झालेला असून दिवसेंदिवस संसर्गाने बांधीताच्या संख्येत मोठी वाढ होऊ लागलेली आहे. त्याचरोबर मृत्यांच्या संख्येतही भर पडू लागलेली असून शहरातील शासकीय रुग्णालमध्ये वीज खंडीत होऊन व्हेंटीलेटर बंद पडल्याची घटना घडली आहे. यामुळे चार रुग्णांचा मृत्यूही झाला असून याबाबत उच्चस्तरीय चौकशी करण्यात अशी मागणी करून दोषीवर कारवाई करण्यात यावी असे निवेदन शहर जिल्हा भाजपाच्या वतीने देण्यात आले आहे. त्याचबरोबर शासकीय रुग्णांलयामध्ये व्हेंटीलेटर व ऑक्सिजन बेडची व्यवस्था उभारली आहे. मात्र वाढणाऱ्या रुग्णसंख्येळे ती अपुरी पडत आहे. त्यामुळे सर्वसामान्य रुग्णांचे उपचाराअभावी प्रचंड हाल होत आहेत. त्यामुळे शासकीय रुग्णामध्ये ऑक्सिजन बेड वाढविण्यात यावेत, रेमडेसिवर इंजेक्शिनची मागणी वाढली असून याचा पुरेसा साठा करत आवश्यक रुग्णांना त्याचा पुरवठा करण्यात यावा. आगामी काळात रुग्णसंख्या वाढण्याची शक्यता गृहीत धरून ऑक्सिजन व रेमडेसिवर इंजेक्शनची आगाऊ मागणी नोंदवून त्याची माहिती वेळोवेळी सार्वजनिक करण्यात यावी. या विविध मागण्याचे निवेदन शहर जिल्हा भाजपाच्या वतीने जिल्हाधिकार्यांना देण्यात आले आहे. या निवेदनाद्वारे करण्यात आलेल्या मागण्यांचे लवकरात लवकर पुर्तता करून सर्वसामान्य रुग्ण व त्यांच्या होणार्या नातेवाईकांची परवड थांबविण्यात यावी अन्यथा तिव्र अंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आलेला आहे. सदर निवेदन शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, संघटन सरचिटणीस मनिष बंडेवार, मनपा सभागृह नेते अ‍ॅड. शैलेश गोजमगुंडे, शहर जिल्हा सरचिटणीस शिरीष कुलकर्णी, प्रविण सावंत, अ‍ॅड. दिग्विजय काथवटे यांनी जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांना दिले आहे.



## लातूरच्या आरोग्यसेवेसाठी कॅलिफोर्नियातून १ लाखांची मदत

**लातूर/प्रतिनिधी**

विदेशात राहत असलो तरी आपल्या जन्मभूमीची ओढ काय असते हे एका लातूरकर सुपुत्राने नुकतेच दाखवून दिले. लातुरातील कोरोना स्थिती पाहता त्यांनी आरोग्यसेवेसाठी १ लक्ष रुपये देण्याची इच्छा व्यक्त केली आणि महानगरपालिकेच्या खात्यात रक्कम जमाही केली. या रकमेतून आरोग्य सुविधेसाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याची खरेदी करण्यात आल्याचे सांगून महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी त्यांचे आभार मानले. कोरोना महामारीच्या अभूतपूर्व संकटात लातूरचे महापौर विक्रांत गोजमगुंडे आणि महानगरपालिका झोकून देवून अहोरात्र करू करीत आहे, त्यांच्या कामास प्रेरित होवून मुळचे लातूरचे पण सध्या कॅलिफोर्नियामध्ये वास्तव्यास असलेले व्यंकटेश बिराजदार हे सोशल मिडीयाद्वारे महापौरांशी जोडलेले आहेत. सध्या मनपाचे सुरू असलेले कार्य आणि लातूरमधील कोरोना परिस्थितीची माहिती घेत त्यांनी स्वतः मेसेज करुन १ लक्ष रुपये लातूरकरांच्या आरोग्य सेवेसाठी देण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार त्यांनी ही रक्कम ऑनलाईन पद्धतीने लातूर महापालिकेच्या खात्यामध्ये पाठवली.व्यंकटेश बिराजदार यांनी पाठविलेल्या मदतीमधून मनपाच्या डेडीकेटेड कोविड केअर सेंटर करिता ऑक्सीजन कॉन्सनट्रेटर मशीन, बी.पी.ई अप्रांटिस, ग्युकोमीटर यासह आवश्यक औषधे खरेदी करण्यात आली. लातूरच्या या दातृत्ववान सुपुत्राचे लातूरचे महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी आभार मानले. सोशल मिडीयाचा असाही फायदा होत असल्याचे नमूद केले. विविध कारणांनी अनेकजण आपले गाव, राज्य आणि देश सोडून परदेशात जातात. असे असले तरी त्यांच्या हृदयात जन्मभूमीची ओढ कायमच असते. या ओढीमुळेच बिराजदार यांनी आपल्याशी संपर्क साधत आरोग्य सुविधेसाठी मदतीची भावना व्यक्त केली. महानगरपालिका लातूरकरांचे आरोग्य जपण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. व्यंकटेश बिराजदार यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वामुळे मनपाच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळाले असल्याचेही महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी सांगितले.




## कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तहसिलदार व गटविकास अधिकारी यांची अजणी येथे भेट

**देवणी/प्रतिनिधी**

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत रुग्णसंख्या झपाट्याने वाढत आहेत. ग्रामीण भागात कोरोनाचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर आढळून येत आहेत अजणी येथे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दि.२० एप्रिल रोजी नागरिकांचे आरोग्य निरोगी राहावे यासाठी संरपच, उपसंरपच यांनी पुढाकार घेऊन गावात सॅनिटायझरची फवारणी केली देवणी तालुक्यात जागतिक महामारीचा संसर्ग मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने खबरदारी म्हणून अजणी गावात जनजागृती करून गावातील नाली, रस्त्याने संपूर्ण गावात सॅनिटायझरने फवारणी करून निर्जतुकीकरण करण्यात आले. यावेळी मा.सुरेश घोळवे तहसिलदार, मनोज राऊत गटविकास अधिकारी यांनी अजणी येथे जावून गावकऱ्यांना व्यवस्थित कोरोना विषयी व पाणंद रस्त्याविषयी माहिती देण्यात आली व कोरोना आपल्या पासून दुर कशा प्रकारे जाईल हे महत्त्वाचे आहे आरोग्याची काळजी घ्यावे आसे गावकऱ्यांना सांगितले. यावेळी उपसरपंच गजानन जनार्धण गायकवाड, तानाजी बिरादार, ग्रामसेवक म्हेत्रे, मुख्याध्यापक बिरादार सर, सुर्यवंशी सर, रमाकांत सुर्यवंशी, रमेश गायकवाड उपस्थित होते.



## थोडक्यात वृत्तांत

### देवणी ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य सेवेबद्दल रासपची पालकमंत्र्यांना तक्रार

देवणी : देवणी येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना व्यवस्थित आरोग्य सेवा मिळत नसल्याची तक्रार बुधवार दि.२१ एप्रिल रोजी राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने पालकमंत्री अमित देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. देवणी येथील ग्रामीण रुग्णालययाच्या दर्जा प्रमाणे सुविधा मिळत नाहीत. ग्रामीण रुग्णालय असून केवळ मात्र प्राथमिक उपचार करण्यात येतो. येणाऱ्या प्रत्येक रुग्णांना उदगीरला रेफर करण्यात येतो. कामचुकार व गैरहजर अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ बदलण्यात यावे व तसेच रुग्णालयात असलेल्या सर्व सुविधा तात्काळ उपलब्ध करून द्यावे असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. राष्ट्रीय समाज पक्षाचे मराठवाडा संपर्क प्रमुख आनंद जीवने उर्फ पृथ्वीराज पाटील यांनी निवेदनाद्वारे पालकमंत्री अमित देशमुख व तसेच राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्याकडे तक्रार केली आहे.

### वलांडी येथे भांडी दुकान प्रशासनाच्या वतीने सील, एकावर गुन्हा दाखल

देवणी : देवणी तालुक्यातील वलांडी येथील मुख्य बाजारपेठेतील भांडी दुकान जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला न जुमानता सुरू ठेवल्या प्रकरणी गुरुवार दि.२२ एप्रिल रोजी प्रशासनाच्या वतीने दुकान सील करण्यात आले असून दुकान मालकावर देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. वलांडी येथील हरीओम भांडी दुकान हे कोविड १९ नियमांचे उल्लंघन करून दि.१९ एप्रिल रोजी साडेचार वाजता दुकानात १५ ते २० व्यक्ती घेऊन व्यापार करताना आढळून आले या प्रकरणी वलांडी तलाठी अबरार मैनोद्दीन शेख यांच्या फिर्यादिवरुन दि.२१ एप्रिल रोजी रात्री उशिरा देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १२३/२०२१ कलम १८८ भादवी व कोविड १९ उपाययोजना नियम ११ सह कलम २,३,४, साथीचे रोग अधिनियम १८९७ नुसार उमाकांत व्यंकटराव इंचुरे यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास हेडकॉंस्टेबल कांबळे हे करीत आहेत.

### वलांडी येथील चौकात विनाकारण फिरणाऱ्यात दोघेजण कोरोना पॉझिटिव्ह



देवणी : देवणी तालुक्यातील वलांडी येथील विनाकारण फिरणाऱ्यांना सोमवार दि.१९ एप्रिल रोजी पथकाने पकडून कोरोना चाचणी घेतली असता दोघांचा कोरोना पॉझिटिव्ह अहवाल आला आहे. तालुका प्रशासनाच्या वतीने देवणी येथील निलंगा-उदगीर मार्गावरून विनाकारण फिरणाऱ्यांचीही यावेळी चौकशी करण्यात आली व वलांडी बसस्थानक चौकात विनाकारण फिरणाऱ्या ५८ व्यक्तींना पथकाने ताब्यात घेऊन रॅपिड अँटिजेन चाचणी घेतली असता यातील दोघांचा अहवाल कोरोना पॉझिटिव्ह आला आहे. सकाळी अकरा वाजल्यानंतर वैद्यकीय कारणाशिवाय जे लोक रस्त्यावर फिरतील त्यांची कोरोना चाचणी करण्यात येईल, तसेच त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही देखील करण्यात येईल. असा इशारा देवणी तहसीलदार सुरेश घोळवे यांनी दिला आहे.

### अनाधिकृत पाणी उपसा बंद करा!

लातूर : लातूर पाटबंधारे विभाग क्र.-१लातूर या कार्यालया अंतर्गत असलेल्या मांजरा डाव्या व उजव्या कालव्याद्वारे सिंचनासाठी आवर्तन चालू आहे. यावेळी शेतकऱ्यांकडून इलेक्ट्रीकल मोटारीद्वारे अनाधिकृत उपसा करण्यात येत आहे. संबंधित शेतकऱ्यांनी अनधिकृत पाणी उपसा बंद करण्यात यावा अन्यथा महाराष्ट्र शासन सिंचन कायदा-१९७६ मधील भाग (६) प्रकरण (१) कलम (४९) (ब) अन्वये प्राप्तअधिकाराचा वापर करून नियमाप्रमाणे कारवाईस जबाबदार रहाल याची गांर्भीयाने नोंद घेण्यात यावी.

## आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी घेतली लस



**मुंबई/प्रतिनिधी**

कोरोना विरुद्धच्या लढ्यात आघाडीवर असणारे राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी आज जे जे रुग्णालयात कोरोना प्रतिबंधात्मक लस घेतली. ४५ वर्षावरील सर्व नागरिकांनी लस घ्यावी, असे आवाहन आरोग्यमंत्र्यांनी यावेळी केले. कोरोनाला हरविण्यासाठी लसीकरण आवश्यक असून आतापर्यत सुमारे १ कोटी २२ लाख लाभार्थ्यांना लस देऊन महाराष्ट्र देशात अग्रस्थानी आहे. १८ ते ४४ वर्षापर्यतच्या नागरिकांचेही लसीकरण सुरू करावे, या मागणीचा पुनरुच्चार आरोग्यमंत्र्यांनी यावेळी केला. फेब्रुवारीमध्ये श्री. टोपे यांना कोरोनाची लागण झाली होती त्याला हरवून ते पुन्हा जनतेच्या सेवेसाठी रुजूही झाले. मात्र, लगेच त्यांना लस घेता येणे शक्य नसल्याने त्यांनी आता दोन महिन्यानंतर लस घेतली. यावेळी त्यांनी लस देणाऱ्या परिचारिका, जे.जे. रुग्णालयाचे डॉक्टर यांचे आभार मानले. मी लस घेतली आपणही घ्या, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## रुग्णालयात कोरोनावर उपचार घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या रुग्णांसाठी रेमडिसेव्हीर इंजेक्शनवरील खर्च आता न्यूक्लिअस बजेटमधून भागविणार

**मुंबई/प्रतिनिधी**

कोरोना संसर्गामुळे खाजगी रुग्णालयात दाखल झालेल्या अनुसूचित जमातीच्या रुग्णासाठीच्या रेमडीसेव्हीर इंजेक्शनवर येणारा खर्च भागविण्यासाठी प्रत्येक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास विभाग यांना न्युक्लिअस बजेटमधून १० लाख रुपयापर्यत निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री अ‍ॅड. के.सी. पाडवी यांनी दिली. सध्या कोरोना संसर्गामुळे अनेकजण आजारी पडत आहेत. आदिवासी भागातही या रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. या पार्श्वभूमीवर आदिवासी बांधवाकडील आर्थिक उत्पन्नाची साधने व त्यांची मर्यादा विचारात घेता खाजगी रुग्णालयात कोरोना आजारामुळे दाखल झालेल्या राज्यातील अनुसूचित जमातीतील रुग्णास रेमडिसेव्हीर इंजेक्शनसाठी येणारा खर्च हा न्युक्लिअस बजेट योजनेमधून खर्च करण्यास मान्यता देण्यात आली असल्याची माहिती पाडवी यांनी दिली आहे.

आदिम जमाती, विधवा, परितक्त्या, निराधार महिला, अपंग, दारिद्र्यरेषेखालील रुग्णांचा प्राधान्याने विचार करण्यात यावा अशा सूचना देण्यात आल्या असल्याचे त्यांनी सांगितले. आदिवासी बांधवांना उपचारासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. आरोग्य विषयक उपाययोजनांसाठी आदिवासी विकास विभागातर्फे १७२ कोटी रुपये देण्यात आले आहेत, असेही त्यांनी सांगितले. आदिवासी उपयोजना क्षेत्र व आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रातील खाजगी रुग्णालयात कोराना या आजारामुळे दाखल झालेल्या अनुसुचित जमातीच्या रुग्णास रेमडिसीव्हीर इंजेक्शनसाठी येणारा खर्च भागविण्यासाठी हा निधी देण्यात आला आहे. हा खर्च करताना प्रकल्प अधिकारी यांनी खालील अटींची पूर्तता होत असल्याची खातरजमा करावी.

१. रुग्ण हा अनुसूचित जमातीचा असावा. त्याचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लक्ष पर्यत असावे. २. खाजगी रुग्णालय हे महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत नोंदणीकृत नसावे. ३. आदिम जमाती, दारिद्र्य रेषेखालील, विधवा, अपंग, परितक्त्या निराधार महिला यांचा प्राधान्याने विचार करण्यात यावा. ४. रेमडिसीव्हीर इंजेक्शनसाठी खर्च करतांना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास यांनी रेमडिसीव्हीर इंजेक्शनसाठी सद्य:स्थितीत असलेल्या विहित कार्यपद्धतीचा अवलंब करावा. यासंबंधीचा शासन निर्णय ही आजच जारी करण्यात आला आहे.

## भिवंडीत आई रागावल्याने मुलीची गळफास घेऊन आत्महत्या!

**भिवंडी/अभिजित हिरे**

सध्या कोरोनाचे संकट असल्याने शासनाने कडक निर्बध लागू करून घरीच राहण्याचे आवाहन केले आहे त्यामुळे घरात राहून कुटुंब टीव्ही किव्हा मोबाईलमध्ये व्यस्त असल्याचे पाहावयास मिळत असल्याने भिवंडी शहरात एक धक्कादायक घटना समोर आली असून टीव्ही पहात असताना मोबाईलवर गेम खेळू नको असे आई रागावल्याने १५ वर्षीय मुलीची गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना न्यू टावरे कंपाऊंड इथं घडली आहे. कोमल रविंद्र सलादल्लू वय १५ वर्ष असे आत्महत्या केलेल्या मुलीचे नाव असून ती घरामध्ये टीव्ही लावून टीव्ही पहात असताना मोबाईलवर गेम सुद्धा खेळत होती त्यावेळी तीची आई रेखा हिने पाहिले असता कोमल हिच्यावर तीची आई रागावली असता कोमल हिला राग आल्याने ती पहिल्या मजल्यावर जाऊन सिलिंग फॅनला तीची ओढणी बांधून गळफास घेऊन आत्महत्या केली आहे याची माहिती मिळताच भोईवाडा पोलीस ठाण्यातील पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तीचा मृतदेह खाली उतरवून इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून मुलीच्या आईची कोणतीही तक्रार नसल्याने भोईवाडा पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे मात्र सध्या मुले घरीच असल्याने मोबाईलच्या जास्त आहारी जात असल्याने पालकांमध्ये हा मोठा चिंतेचा विषय बनला आहे.




क्राईम Reporter
9890718873

क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.

26 APRIL TO 02 MAY 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 24/04/2021 8:03 PM Page 1



# कोव्हिड सेंटरच्या १५व्या मजल्यावरील बाथरूमच्या खिडकीतून दोन कैदी पसार



**भिवंडी/आकाश गायकवाड**

भिवंडी-कल्याण मार्गावर राजणोली नाका बायपास येथील २२ मजली टाटा आमंत्रा कोविड सेंटरच्या १५ व्या मजल्यावर कोरोना बाधित असलेल्या २ अट्टल कैद्यांवर उपचार सुरु असतानाच या दोन्ही कैद्यांनी बाथरूमच्या खिडकीच्या काचा काढत १५व्या मजल्यावरून बाथरूमच्या पाईपवरून खाली उतरून पसार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी शोध सुरु केला आहे. गाजीदारा जाफरी (२५) खुर्शीद अब्दुल हमिद शेख (३३) असे फरार झालेल्या अट्टल कैद्यांचे नावे आहेत.

कल्याणच्या आधारवाडी कारागृहात कोरोनाने शिरकाव केला असून कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या ३० कैद्यांना काही दिवसापूर्वीच कोरोनाची लागण झाल्याची खळबळजनक घटना समोर आली होती. कोरोना बाधित या सर्व कैद्यांची उपचारासाठी ठाणे येथील सिविल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यातच फरार झालेले गाजीदारा जाफरी आणि खुर्शीद या दोघांचाही शिक्षा भोगत असताना कारागृहात १९ एप्रिलला कोरोना चाचणी अहवाल पॉझिटिव्ह आला होता. त्यामुळे या दोघांना उपचारासाठी कल्याण - भिवंडी मार्गावर राजणोली नाका बायपास येथील टाटा आमंत्रा कोविड सेंटरच्या १५ व्या मजल्यावर उपचारासाठी दाखल केले होते. मात्र उपचार सुरु असल्याचा फायदा घेत, ज्या १५ मजल्यावरच्या रूममध्ये उपचार सुरु होते. त्या रूममधील बाथरूमच्या खिडकीच्या काचा काढून त्यातून बाहेर पडत पाईपवरून खाली येत पळ काढला. याप्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी या फरार कैदयांचा शोध सुरु केला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने करीत आहेत.

भिवंडी -कल्याण मार्गावर राजणोली नाका बायपास येथील टाटा आमंत्रा कोविड सेंटरमध्ये कोरोना पॉझिटिव्ह असलेला खुनाच्या गुन्हयातील आरोपी गर्दीचा फायदा घेऊन फरार झाल्याची घटना जून महिन्यात घडली होती. विशेष म्हणजे या फरार झालेल्या आरोपीला पकडण्यासाठी पोलिसांनी बक्षीस जाहीर केले होते. याप्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरु केला होता. बाळू खरात (वय ४९) असे फरार होऊन पुन्हा मध्यवर्ती पोलिसांच्या तावडीत सापडलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी बाळूवर त्याच्या पत्नीचा खून केल्याप्रकरणी खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली होती.

विशेष म्हणजे टाटा आमंत्रा कोविड सेंटरमध्ये ठाणे जिल्ह्यातील ग्रामीणसह भिवंडी, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली या तिन्ही महापालिकेच्या हद्दीतील हजारो रुग्ण येथे उपचार घेत होते. त्यामुळे याठिकाणी दरदिवशी मोठ्या प्रमाणात गर्दी होत होती. आधारवाडी कारागृहात एखाद्या कैद्याला थंडी-ताप आल्यास कारागृहातील विलगीकरण कक्षही बनवण्यात आला असून कोरोनाची लक्षणे असणाऱ्या कैद्यांना तात्पुरत्या स्वरूपात याठिकाणी ठेवण्यात येते. तसेच डॉन बोस्को शाळेमध्येही विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आला असून नविन कैद्यांना त्याठिकाणी ठेवले जात आहे.

## संपादकीय

### सरकार आणि पालिकांच्या 'अब्रू'चा कोळसा



संपूर्ण देशात सध्या महाराष्ट्र हा कोरोनाचा मोठा हॉटस्पॉट ठरलेला आहे. महाराष्ट्रातली सर्व हॉस्पिटल कोरोना रुग्णांनी भरलेली आहेत. पण या हॉस्पिटलच्या सुरक्षेचे काय? बुलढाणा येथील घटनेनंतर सरकारने सर्व रुग्णालयाचे फायर ऑडिट करण्याचे आदेश दिले होते आणि या आदेशाची अंमलबजावणी होते की नाही याची पाहणी करण्याचे काम स्थानिक लोकप्रतिनिधींचे होते. पण कुणालाच काही पडलेली नसल्याने रुग्णालयातील कोरोना पेशंट अक्षरशः राम भरोसे होते. त्यामुळेच विरार येथील विजय वल्लभ रुग्णालयामध्ये भीषण अग्निकांड घडून १५ कोरोना बाधितांचा दुर्दैवी मृत्यू झाला. महाराष्ट्रात ४८ तासात रुग्णालयांमध्ये दोन मोठ्या दुर्घटना घडल्या. नाशिकमध्ये गॅस गळती होऊन २९ कोरोना बाधितांचा मृत्यू झाला आणि पाठोपाठ विरार मधील दुर्घटना घडली. या दोन्ही घटनांमध्ये तब्बल ४३ कोरोना बाधितांचा मृत्यू झाला आणि हे मृत्यू मानवी चुकांमुळे झालेले असल्याने याची संपूर्ण जबाबदारी अर्थातच सरकार आणि स्थानिक महापालिकांची आहे. त्यामुळे केवळ मृतांच्या वारसांना पाच आणि सात लाखांची नुकसान भरपाई देवून चालणार नाही, तर या दोन्ही दुर्घटना जबाबदार असलेल्या लोकांना फासावर लटकावयाला हवे. वास्तविक या घटनांची जबाबदारी स्वीकारून मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यायला हवा होता. पण आजकाल राजकारण्यांकडून नैतिकता आहेच कुठे? नैतिकता नसल्यामुळेच ते बिनधास्त आहेत तर जनता राम भरोसे. कारण आज संपूर्ण महाराष्ट्रात लाखो कोरोना बाधित वेगवेगळ्या खाजगी, सरकारी रुग्णालयांमध्ये तसेच कोव्हीड सेंटरमध्ये उपचार घेत आहेत आणि या सर्व हॉस्पिटल आणि कोव्हीड सेंटरमध्ये सध्या मोठ्या प्रमाणावर ऑक्सिजनची मागणी आहे. मागणी आणि पुरवठा यामध्ये मोठी तफावत निर्माण होऊ लागल्याने काही महानगर पालिकांनी स्वतःचे ऑक्सिजन प्लांट तयार करण्याचा निर्णय घेतलाय पण सुरक्षेचे काय? ऑक्सिजन हाताळणारे जे लोक आहेत त्यांना योग्य प्रशिक्षण देण्याबाबत सरकारने किंवा महानगर पालिकांनी विचार केलाय का? देशातील रुग्णालयांमध्ये ऑक्सिजनमुळे अनेक दुर्घटना घडल्या आहेत. पण केवळ या दुर्घटनाची वरचेवर चौकशी करायची आणि त्यातून दोषींना कसे वाचवता येईल यासाठी प्रयत्न करायचे असेच प्रकार घडलेत. बुलढाण्यातील ९ अर्भकाच्या मृत्यू प्रकरणात जे मुख्य दोषी होते त्यांना अशाच प्रकारे वाचवण्यात आले. कारण वरिष्ठांचे थेट मंत्रालयाशी लागेबांधे असतात. त्यामुळे जे बडे अधिकारी असतात ते कुणाला तरी बळीचा बकरा बनवून सेफ होतात. आता नाशिक दुर्घटनेत सुद्धा तेच होणार आहे. ऑक्सिजन सिलेंडरची हाताळणी आपल्याकडे नेहमीच अत्यंत बेजबाबदारपणे केली जाते. त्यामुळे ऑक्सिजनचा सिलेंडरला महाना किंवा मोठ्या टोक्या म्हणा कुणीही कसेही हाताळतो आणि जेंव्हा प्रशिक्षित नसलेले लोक सिलेंडर हाताळतात तेंव्हा दुर्घटना घडतात. सध्या अशी परिस्थिती आहे की प्रत्येक रुग्णालय असो की कोव्हीड सेंटर असो, तिथे ऑक्सिजन सिलेंडरचा साठा असतोच. पण ऑक्सिजनचा हा साठा हाताळण्यासाठी जे प्रशिक्षित कर्मचारी लागतात ते मात्र नसल्याने जे काल नाशिकच्या झाकीर हुसेन रुग्णालयात घडले त्याची कुठल्याही रुग्णालयात किंवा कोव्हीड सेंटरमध्ये पुनावृत्ती होऊ शकते. म्हणूनच सरकार असो की महानगर पालिका सर्वांनीच ऑक्सिजनचा सुरक्षेबाबत गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. अन्यथा लोकांचा जीव वाचवण्यासाठी आणलेला ऑक्सिजन लोकांसाठी काळ ठरेल.

# सोलापूर पोलीस आयुक्तालयाच्या कोविड सेंटरचे उद्घाटन




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहर पोलीस दलातील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी तसेच त्यांच्या कुटूंबियासाठी पोलीस आयुक्तालय व सोनाई फाउंडेशनच्या वतीने कोविड सेंटरची उभारणी करण्यात आलीय त्याचे उदघाटन शुक्रवारी पोलीस मुख्यालयातील पोलीस पब्लिक स्कूलमध्ये करण्यात आली आहे. सोलापूर शहर पोलीस कोविड सेंटरचे उदघाटन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, महापालिका आयुक्त पी. शिवशंकर, पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, सोनाई फाउंडेशनचे डॉ.योगेश राठोड व डॉ.निलरोहित पैके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पोलीस उपायुक्त डॉ.दीपाली धाटे, बापू बांगर, डॉ वैशाली कडूकर, सहाय्यक पोलीस आयुक्त अभय डोंगरे, माधव रेड्डी तसेच इतर पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय स्टाफ यांची उपस्थिती होती. सध्या कोरोनाची दुसरी लाट देशात व संपूर्ण महाराष्ट्रात पसरलेली असताना पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी फ्रंट लाईनवर उभे राहून कर्तव्य बजावत आहेत. अशा वेळी अनेक पोलीस अधिकारी, कर्मचारी कोरोना विषाणूने बाधीत होत आहेत. अनेक हॉस्पिटलमध्ये बेडची कमतरता भासत असल्यामुळे पोलीस आयुक्त अंकुश शिंदे व पोलीस उपायुक्त डॉ दीपाली धाटे यांच्या संकल्पनेतून पोलिसांकरिता ऑक्सिजन युक्त सेमी व्हेंटिलेटर व व्हेंटिलेटरसह ६० बेडचे सुसज्ज कोविड हॉस्पिटल तयार करण्यात आले. त्याचा फायदा पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियाकरिता होणार आहे.

# देवणी व वलांडी येथे पालकमंत्री अमित देशमुख यांनी भेट देऊन घेतला कोरोना बाबतीत आढावा

**देवणी/शकिल मनियार**



लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री अमित देशमुख यांनी रविवार दि.१८ एप्रिल रोजी रात्री वलांडी व देवणी येथील कोविड केअर सेंटर येथे भेट देऊन कोरोना उपाययोजना संदर्भात आढावा घेतला. वलांडी बसस्थानक चौकात संबंधित यंत्रणेशी व नागरीकांशी संवाद साधून देवणी येथील मागासवर्गीय मुलांच्या वस्तीगृहाच्या इमारतीत सुरू असलेल्या कोविड केअर सेंटरमधील रुग्णांवर होत असलेले उपचार आणि तालुक्यात कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राबवण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला. देवणी ग्रामीण रुग्णालयातील जास्तीत जास्त बेड ऑक्सिजनयुक्त करून किमान ५ बेडला व्हेंटिलेटर व्यवस्था करावी, या रुग्णालयात ऑक्सीजन प्लांट उभारण्याबाबत प्रस्ताव सादर करावा, आरोग्य अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अनिवार्यपणे मुख्यालयी राहावे, लॉकडाऊन नियमांची कडक अंमलबजावणी करावी, विनाकारण फिरणाऱ्यांची कोरोना चाचणी करावी. यासह आदी सुचना केल्या. यावेळी जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, तहसीलदार सुरेश घोळवे अभय साळुंखे, दिलीप पाटील नागराळकर, बालाजी सोनकावडे, वैजनाथ लुल्ले, अनिल इंगोले यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

## लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात कोव्हिड १९ मदत केंद्राची स्थापना

**लातूर/प्रतिनिधी**

वाढत्या कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे जिल्हयातील सर्व शासकीय तसेच मान्यताप्राप्त कोव्हिड-१९ रुग्णांना बेडची उपलब्धता तसेच बेड उपलब्ध असलेल्या हॉस्पिटलचे नाव, त्यामध्ये विना ऑक्सिजन बेड, ऑक्सिजनसह बेड व व्हेंटीलेटर बेड इत्यादीची माहिती देण्यासाठी व नागरिकांच्या कोव्हिड संदर्भात इतर समस्यांबाबत संपर्क करण्याकरिता ०२३८२-२२३००२ या टोल फ्री क्रमांकावर नागरिकांनी फोन करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी. तसेच सदरच्या नियंत्रण कक्षात २४ तास चार कर्मचाऱ्यांच्या शिफ्टमध्ये नेमणूका केलेल्या असून आपणास बेड उपलब्धेबाबत २४ तास माहिती दिली जाईल. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी.यांनी केले आहे.

# 'पट्टेरी वाघाचे' कातडी व पंज्याचे तस्करी करणारी चौकडी पोलिसांच्या जाळयात!

**भिवंडी/अभिजित हिरे**



राष्ट्रीय वन्यजिव प्राण्याची म्हणजेच पट्टेरी वाघचे कातडी व पंज्याचे तस्करी करणारी चौकडी कोनगाव पोलिसांच्या जाळयात अडकली आहे. या तस्करांकडून लाखोंचा मुद्देमालही जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. प्रशांत सुशिलकुमार सिंग, (वय २१, रा. वडाळा पुर्व, मुंबई) चेतन मंजे गौडा (वय २३ रा.वडाळा, मुंबई) आर्यन मिलींद कदम (वय २३ रा. वडाळा पुर्व, मुंबई) अनिकेत अच्युत कदम (वय २५ रा. सायन कोळीवाडा, मुंबई) असे अटक करण्यात आलेल्या तस्करांची नावे आहेत. भिवंडी तालुक्यातील नाशिक-मुंबई बायपास महामार्गावर ठाकुरपाडा गावाच्या हद्दीतील बासूरी हॉटेलचे समोर काही तस्कर पटटेरी वाघ या वन्यजिव प्राण्याचे कातडे व पंजा विक्री करणेकरीता येणार असल्याची माहिती सहा. पोलीस निरीक्षक अभिजीत पाटील यांना मिळाली होती. त्याअनुषंगाने कोनगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणपतराव पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक, अभिजीत पाटील यांनी वन विभागाचे कर्मचारी व वॉर रेस्क्यु फाऊन्डेशनचे वन्यजिव अभ्यासक सुहास पवार व योगेश कांबळे यांचेसह सापळा रचुन चार जणांना ताब्यात घेतले. याप्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात वन्यजिव संरक्षण कायदा १९७२ चे कलम ९, ३९(३), ४४, ४८(अ), ४९(बी), ५१ प्रमाणे दाखल करून लाखो रुपये किंमतीचे पट्टेरी वाघ या राष्ट्रीय वन्यजिव प्राण्याचे सोलुन काढलेले, कडक झालेले व सुकलेले काळया व पिवळया पट्टे असलेले कातडे, व पट्टेरी वाघ'या राष्ट्रीय वन्यजिव प्राण्याचा पाच नखे असलेला पंजा असा मुददेमाल हस्तगत केला आहे. लाखो रुपये किंमतीचे पट्टेरी वाघाचे कातडे कुठून आणले व कोणाला विक्री करण्यासाठी मुंबई वरून मुंबई - नाशिक महामार्गावर आले होते याचा तपास सुरु पोलिसांनी सुरु केल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणपतराव पिंगळे यांनी दिली आहे. तर पोलीस उप निरीक्षक पराग भाट, सहा. पोलीस उप निरीक्षक, वामण सुर्यवंशी, पो.हवा राजेश शिंदे, संतोष मोरे, पो.ना विनायक मासरे, संतोष पवार, अविनाश पाटील, अशोक ढवळे, कृष्णा महाले व गणेश चोरगे या पोलीस पथकाने तस्करांना पकडण्यासाठी सापळा रचला असुन या गुन्हयाचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजीत पाटील करीत आहेत.

# आयपीएल क्रिकेट सट्ट्यावर मुळेगाव तांड्याजवळ धाड

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांड्याजवळील एका सोसायटीत सुरु असलेल्या आयपीएल क्रिकेट सट्यावर सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने धाड टाकून पाचजणांवर गुन्हा दाखल केला असून तिघांना अटक करण्यात आली आहे. याबाबत पोलीस उपनिरीक्षक अमित सिद-पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गोपाळ सुभाष राठोड (वय ३४, रा. एल.के. पी.सोसायटी, मुळेगाव तांडा), गुरूनाथ आण्णाप्पा आचलारे (वय ३९, रा. हत्तुरे वस्ती), सागर भारत हेडगिरे (वय ३०, रा. एकता नगर), सम्राट माने (रा. गुलमोहर अपार्टमेंट), गोटू रोडगे (रा. मॅकेनिक चौक) या पाचजणांवर सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळामार्फत सध्या आयपीएल क्रिकेट स्पर्धा सुरू आहे. सदर क्रिकेट सामन्यात चालणारे टॉस, रन्स, विजय व इतर बाबींचा अवैधरीत्या सट्टा ग्रामीण हद्दीमध्ये सुरु असल्याची माहिती प्राप्त होती. हा सट्टा शहरातील दोन एजंटामार्फत मुळेगाव मुळेगाव तांडा येथील एल.के.पी. सोसायटीमध्ये एका इसमाच्या घरामध्ये पहिल्या मजल्यावरील रूममध्ये घेण्यात येत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यावर कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिले होते. त्यानुसार मंगळवारी रात्री साडेदहाच्या सुमारास सोसायटीमधील सदर घरावर छापा टाकला असता एका रूममध्ये दोन इसम ११ मोबाइल, १ टीव्ही, १ लॅपटॉपच्या सहाय्याने मुंबई इंडियन्स व दिल्ली कॅपिटल्स या दोन संघांदरम्यान सुरू असलेल्या क्रिकेट मॅचवर सट्टा घेत असताना सापडले. पोलिसांनी मोबाइल, टीव्ही, लॅपटॉप, चार्जर, हिशेबाची नोंदवही, पेनड्राईव्ह आदी साहित्य जप्त केले आहे. सदर मिळून आलेल्या इसमांकडे अधिक चौकशी करता ते सोलापूर येथील दोन बुकींच्या माध्यमातून सट्टा पुढे देत असल्याची माहिती पुढे आली आहे.ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक अमित सिद पाटील, सहायक फौजदार निलकंठ जाधवर तसेच बिराजी पारेकर, श्रीकांत गायकवाड, सचिन वाकडे, सलीम बागवान, परशुराम शिंदे, लाला राठोड, अजय वाघमारे, महिला पोलीस कॉन्स्टेबल सरस्वती सुगंधी आदींनी केली.

# वलांडी पंचायत समिती गणातील भाजपच्या सदस्या शिला सजनशेट्टे यांचा राजीनामा

**देवणी/प्रतिनिधी**



वलांडी पंचायत समिती गणातील भारतीय जनता पार्टीच्या इतर मागास प्रवर्गातील सदस्या शिलाताई प्रकाश सजनशेट्टे यांनी सभापती व उपसभापती व तसेच गटविकास अधिकारी यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून शुक्रवार दि.२३ एप्रिल रोजी आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने तालुक्यातील राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. देवणी पंचायत समितीच्या सहाच्या सहा जागा जिंकून भाजपची एकहाती सत्ता आहे. या टर्ममध्ये इतर मागास प्रवर्गातील एकमेव सदस्या शिलाताई सजनशेट्टे वगळता बाकी सर्व पाच सदस्यांनी सभापती व उपसभापती पदाचा पदभार घेतला. पद संदर्भात अन्याय तर झालेच, शिवाय संबंधित सभापती व उपसभापती आणि गटविकास अधिकारी यांच्या मनमानी कारभारामुळे वलांडी पंचायत समिती गणातील नागरिकांचे महत्त्वाचे अनेक प्रश्न सोडविता आले नाही या कारणास्तव राजीनामा दिल्याचे यावेळी शिला सजनशेट्टे यांनी बोलताना सांगितले. भाजपच्या पदाधिकारी यांच्या वतीने इतर मागास प्रवर्गातील महिला सदस्यावर झालेला अन्याय भविष्यात या भागातील ओबीसी मतदानावर परिणाम होणारा आहे. अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे.